MAHMAR/19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष अकरावे / अंक १२ / नोव्हेंबर २०१०

## संपादकीय

## संस्कृतचे ऋण

गेल्या महिन्याच्या संपादकीयात शिक्षण क्षेत्रातील येऊ घातलेल्या बदलांमागील भूमिकांचा उहापोह आपण केला. साक्षरतेकरता भाषा आणि आणि लिपी या दोन्ही गोष्टी विकसित व्हाव्या लागतात. हे दिसायला सोपे असले, तरी महाकठीण काम आहे. रानटी अवस्थेपासून सभ्य संस्कृतीकडे झालेल्या वाटचालीतील तो एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताचे या क्षेत्रातील योगदान हे मूलगामी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. जगातल्या सगळ्या संस्कृतींमधून भाषा आणि लिप्या निर्माण झाल्या. १७८५ साली भारतात कलकत्ता येथे न्यायाधीश म्हणून नेमणूक झालेल्या विल्यम जोन्स यांच्या संस्कृत आणि ग्रीक, लॅटिन भाषांच्या अभ्यासानंतर भाषांच्या इतिहासाच्या अभ्यासाला जगात सुरुवात झाली. संस्कृत, ग्रीक,लॅटिन या भाषांतील साधर्म्य बघून ते स्तंभित झाले. किंबहुना ग्रीक व लॅटिनपेक्षा संस्कृत भाषेची वैज्ञानिक रचना व तिची अभिव्यक्तीक्षमता त्यांना या दोन्ही भाषांपेक्षा प्रगल्भ दिसल्या. संस्कृतची खिडकी त्यांनी जगाला उघडून दिली. संस्कृत भाषेचे हे सौंदर्य व वैशिष्ट्य आणि ग्रीक व लॅटिन भाषांशी असणारे साधर्म्य हे गोव्याचा पहिला राज्यपाल अलफान्सो अल्बुकर्क पासून ते अगदी बंगाली भाषेचे व्याकरण लिहिणाऱ्या हालहेड यांच्यापर्यंत सर्वांनी विल्यम जोन्सच्या पूर्वीच निदर्शनास आणून दिले होते.

संस्कृत पोथ्या जमवणारा अभ्यासक पो, पाणिनीच्या व्याकरणाचे लॅटिन मध्ये १६ व्या शतकात पहिल्यांदा भाषांतर करणारा धर्मप्रसारक रॉथ व १७७१ साली अवेस्ताचे लॅटिनमध्ये भाषांतर करणारा द्युफेराँ अ‍ॅक्तील हे नुसतेच संस्कृत भाषेचे अभ्यासक नव्हते तर युरोपात या भाषेचे महत्त्व पटवून देण्याचा त्यांनी चंगच बांधला होता. संस्कृत वर्णमालेचा अभ्यास करण्याकरता तिचे तक्ते त्यांनी युरोपात अभ्यासासाठी नेले. या पार्श्वभूमीवरच विल्यम जोन्स यांनी भाषाशास्त्रात महत्त्वाची ठरलेली 'भारोपीय' भाषा (इंडोयुरोपियन) ही संकल्पना मांडली.

आजचे आपले भाषाशास्त्राचे सर्व अभ्यासक या सिद्धान्ताला प्रमाण मानूनच काम करतात. या सगळ्यांचा मथितार्थ एवढाच आहे की, संस्कृत भाषा आणि देवनागरी लिपी यांची निर्मिती वैज्ञानिक, तार्किक पायावर उभी आहे. आजही ही वैज्ञानिकता जगातील इतर कुठल्याही भाषेला नाही. हे कटू सत्य आहे. भाषाशास्त्राच्या सर्व अभारतीय

(मलपृष्ठ २ वर)

मुखपृष्ठावरून– संपादकीय

**संस्कृतचे ऋण**

अभ्यासकांना हे मान्य आहे. परंतु सिद्धांतवाद आणि ब्राह्मणद्वेषाच्या दावणीला बांधलेल्या भारतीय अभ्यासकांना व साहित्यिकांना मात्र हे सत्य डोळ्याआड करावेसे वाटते. बहुजन, महाजन, ग्रामीण, शहरी, बोली भाषा, प्रमाण भाषा, स्त्री–पुरुष, संस्कृत, प्राकृत इ. अनेक अंगरखे घालून संस्कृत भाषेच्या वैज्ञानिक रचनेला उणेपणा आणण्याचा त्यांचा केविलवाणा प्रयत्न असतो.

२००५ साली बँकॉक येथे 'आशिया खंडातील संस्कृत' या विषयावर एक जागतिक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. फ्रिट्स स्टाल (Frits stall) या भाषाकोविदाने या परिषदेत आपले बीजभाषण सादर केले. थायलंड, मलेशिया, कंबोडिया, व्हिएतनाम, लाओस, इंडोनेशिया या सर्व भाषांच्या जडणघडणीत संस्कृतचा वाटा तर त्यांनी विस्तृतपणे विशद केलाच आणि आपले चार महत्त्वाचे निष्कर्ष भाषणाच्या शेवटी मांडले. त्यांचा पाचवा निष्कर्ष त्यांच्याच भाषेत उद्धृत करत आहोत, "My fifth and final conclusion is hypothetical in character. If the sound pattern of Sanskrit had also reached the Near East and Europe, there would not be so many clumsy alphabets around and the modern world would have the benefit of rational and practical numerals"

या निष्कर्षाच्या कारणमीमांसेआधी आपल्या शोधनिबंधात भारतीय वर्णमाला वैज्ञानिक असूनही मध्यपूर्व आणि युरोपमध्ये ती न पोचण्याचे स्पष्ट कारण ... because of prejudice, narrow mindedness and plain ignorance. लक्षात ठेवा, २००५ सालचे हे एका भाषातज्ज्ञाचे विचार आहेत.

वर्ण व लिपीप्रमाणेच मौखिक परंपरा आणि पाठांतर हेही भारतीय भाषाशास्त्राचे बलस्थान आहे. वैदिक संहिता हजारो वर्षे पाठांतराच्या माध्यमातून पुढील पिढ्यांमधून संक्रमित होत राहिली. तीमध्ये कुठल्याही प्रकारचा कानामात्रेचाही फरक होऊ नये, म्हणून या पाठांतरप्रक्रियेस एका वैज्ञानिक सूत्रात बांधण्यात आले. याची ही रचना आणि क्षमता बघून आजचे जगातील सर्वच संगणकतज्ञ या प्रक्रियेच्या प्रेमात पडले आणि हजारो वर्षांपूर्वी निर्माण केल्या गेलेल्या या विज्ञानसूत्रांचा संगणकीय भाषेला उपयोग होईल काय, याचा अभ्यास त्यांनी सुरू केला.

परीक्षेकरता पाठांतर करू नये हे खरे आहे; पण पाठांतरच चूक आहे, असे म्हणणे आत्मघातकी आहे. लूडो रोचर हे दुसरे एक महान अभ्यासक. १९९४ साली Orality and Textuality in Indian Context हा निबंध त्यांनी सादर केला. भारतीय, विशेषत: वैदिक आणि संस्कृत भाषांच्या अभ्यासातील पाठांतराचे महत्त्व आणि त्यामागील वैज्ञानिक दृष्टी त्यांनी या शोधनिबंधात विस्तृतपणे मांडली आहे. तो लेख मुळातून वाचणे अत्यावश्यक आहे. पण त्यांचे एक निरीक्षण त्यांच्याच भाषेत देत आहोत.

''The difference between the Indian and western appreciation of the Sanskrit literature may be illustrated by the fact that the Sanskrit equivalent of English "well read" is "bahushruta", well heard, having heard much.''

ही एक फार मोठी दुर्दैवाची बाब आहे की, पाश्चात्त्य अभ्यासकांना गेल्या अनेक शतके संस्कृत भाषा आणि देवनागरी लिपीच्या निर्मितीमागील वैज्ञानिक विचार अत्यंत मर्मग्रही दृष्टीने दिसू शकतो; पण बहुतांशी त्यांच्याच ओंजळीतून विज्ञान शिकणाऱ्या भारतीयांना मात्र या गोष्टीची मांडणी

(मलपृष्ठ ३ वर)

वर्ष अकरावे/अंक १२/नोव्हेंबर २०१०

वर्ष अकरावे/अंक १२/ नोव्हेंबर २०१०

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक ५ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मानवासमोरील प्रश्नचिन्ह | श्री. शंकर मठ | ३ |
| २) | लीलावती आणि Hypatia | डॉ. बाळ गांगल | ६ |
| ३) | एक ऐतिहासिक घटना एका ऐतिहासिक शहरात | डॉ. सुधाकर आगरकर | ९ |
| ४) | सलाम हिंदवी स्वराज्याला | श्रीमती आशा भिडे | १२ |
| ५) | संत साहित्यातील काही 'कण' आणि काही 'क्षण' | सौ. सुनीता गणपुले | १४ |
| ६) | व्यक्तिविशेष : श्री रामचंद्र सदाशिव ठाकूर | श्री. पी. एम्. पाटील | १९ |
| ७) | 'वांद्रे वरळी सागरी सेतू': एक अभियांत्रिकी आश्चर्य | श्री. सुभाष जोशी | २० |
| ८) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २३ |
| ९) | स्वर्ग | श्री. यशवंत माने | २८ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा आणि स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून, संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **‘दिशा’** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती ! तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.**

**संपादक, दिशा**
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ‘‘**विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा**’’ या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/–**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/– फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# मानवासमोरील प्रश्नचिन्ह

*शंकरराव मठांच्या व्यावंसर्ग विचार लेखांतील हा पुढील लेख - संपादक*

**आजही समस्या सुटल्या नाहीत :**

काल प्रवाह अखंड चालू आहे. त्या बरोबरच मार्ग क्रमण करणारा जीवनाचा ओघही अखंड प्रवाहित आहे. कालानुरूप मानवी जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. या बदलांमुळे सामाजिक जीवन नित्य नवीन रूप धारण करीत आहे. हे सर्व घडत असताना मानव मात्र तसाच राहिला आहे. त्याच्या अंतरंगात कुठेच बदल घडलेला नाही. वासना, आकांक्षा, सुख, दुःख, रागद्वेष, भावना संसारात एकमेकांवर कुरघोडी करण्याची प्रवृत्ती या साऱ्यांत युगानुयुगे फरक पडलेला नाही. जीवनातल्या समस्या, या व्यवहारातून निर्माण होणारे प्रश्न सर्व काळी मानवाला त्रस्त करत आहेत. त्यावर उपाय शोधण्याचे प्रयत्न मानव करीतच आहे. या प्रश्नांना योग्य उतारा प्राप्त करण्यात मानव अयशस्वी ठरला आहे. खरे समाधान कशात आहे? नशीबाचा भाग किती? प्रयत्नांचा भाग किती? मानवाचे प्रयत्न कुठे कुंठित होतात व कुठून नशीबाचा भाग सुरू होतो? आपोआप निर्माण होण्याऱ्या दुःखाला जबाबदार कोण? व्यक्ती, समाज की निसर्ग? सज्जनपणे वागणारा दुर्दैवी का ठरतो? दुर्जन उत्कर्ष पावताना का आढळतो? अनादी काळापासून हे प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत. समाधान, आनंद, शांती, प्रेम, तृप्तता, संतुष्टता इत्यादी गोष्टी आजही दुर्लभ आहेत.

**उपनिषदांचा दृष्टिकोन :**

उपनिषदांतील शिकवण मानवाला कल्याणमय आणि समाधानी जीवनाचा मार्ग दाखवते. जीवन आनंदमय बनवते. हे संपूर्ण विश्व जड आणि चेतन या तत्त्वांनी व्याप्त आहे. स्थूल व दृश्य हे अपूर्ण आहे. सूक्ष्म व अदृश्य हे पूर्ण आहे आणि चैतन्यमय आहे. वास्तविक अपूर्णदेखील पूर्णचाच एक भाग आहे. या चैतन्यमय आणि पूर्ण तत्त्वालाच ईश्वर असे म्हटले जाते. जगातील साऱ्या घटना या मानवाकरवी ईश्वरी सत्तेने घडतात. हा भाव अंत:करणात स्थिर झाला, म्हणजे त्या घडण्यात न घडण्याबद्दलचा द्वेषभाव अनाठायी असल्याचे ध्यानात येईल. प्रत्येक घडणे व बिघडणे यामागे ईश्वराची प्रेरणाच असते, हे जाणले असता मनाची शांती ढळणार नाही. मानवासहित सर्व वस्तूंवर सत्ता कुणाची चालत असेल तर फक्त ती ईश्वराची चालते. देहाने कर्म करावे मनाने ईश्वराचे असावे. ईश्वराच्या स्मरणात जगणे हे आनंदी जीवनाचे रहस्य आहे. भगवंताला विसरणे हाच भोगवाद, अशांती होय. जग वा विश्व हा भगवंताचा विलास म्हणून अपूर्ण. फक्त भगवंतच पूर्ण. भगवंताचा विसर पडल्यास राहाते, ती फक्त अपूर्णता. अपूर्णतेच्या चिंतनाने मानव आनंदी कसा होईल? एक भगवंत सोडून इतर सारे मिळवण्याचा मानव प्रयत्न करीत असतो. यालाच माया म्हणतात. हेच मानवाचे अज्ञान. हेच दुःखाचे मूळ कारण.

**आत्मज्ञान कसे होईल? :**

इंद्रियांच्या ठिकाणी शक्ती मर्यादित असते. यामुळे अमर्याद अनंत शक्तीचे दर्शन इंद्रियांच्याद्वारे होणे अशक्य. मानवी बुद्धीने स्वत: अनंत, नि:सीम अगर विशाल व्हावे. इंद्रियांची कुबडी फेकून द्यावी. तरच ती आत्मबुद्धीकडे वळेल. अन्यथा देहात्म बुद्धी तशीच राहील. मी भगवंताचा आहे. या दृढ भावनेने देहबुद्धी कमी होईल, देहाचे सारे व्यवहार शांतपणे आणि द्रष्टेपणे पाहता येतील. देहबुद्धीतून होणारा संकुचित व्यवहार बदलून जाईल

आणि विशाल भूमिकेवरून व्यवहार घडू शकेल. जगातील साऱ्या दृश्य वस्तूमागे आत्मसत्ता कार्य करते. त्या सत्तेला शरण जाऊन आपल्या वाटेला आलेले काम कर्तव्य बुद्धीने करीत राहावे. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तीनही अवस्थांत भगवंताचा विसर पडू न देणे हे उपासना पक्वतेचे लक्षण आहे. यालाच अनुसंधान म्हणतात. यामुळेच अंत:करणाची विशालता निर्माण होते. असा माणूस सर्वांनाच हवाहवासा वाटतो. इंद्रियांना आणि विकारांना स्वैर उधळू देऊन चित्ताचे समाधान होणे अशक्य. कर्म म्हणजे आतील व्यवस्थेचे व्यक्त रूप. मानवी जीवन आनंदी बनण्यास आत्मज्ञानावाचून अन्य उपाय नाही. अनात्म वस्तूतून आनंद कदापि मिळणार नाही. हे पक्केपणे मनात ठसले पाहिजे.

**आनंद मीमांसा :**

प्रसन्न होणे, तृप्त होणे, समाधान पावणे याला आनंद म्हणतात. आनंद म्हणजे प्रसन्नता, तृप्तता, समाधान यांची परिसीमा होय. पूर्ण समाधान, आत्मशांती, आत्मतृप्ती याला आनंद म्हणतात. आनंद म्हणजे सुख नव्हे, देहाचा आराम नव्हे, प्रपंचाची सुस्थिती नव्हे, जे हवे ते मिळणे नव्हे. थोडक्यात, इंद्रियांना भावणाऱ्या अगर देहाने भोगता येणाऱ्या दृश्य वस्तूंऐवजी आनंद वेगळा आहे. आनंद देहद्वारे अनुभवावयाचा असला तरी ती तो इंद्रियांच्याद्वारे घडत नाही. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय याच्या पलीकडे आनंद आहे. देहाला उत्तम स्थितीत सुख मिळेल, आनंद मिळेलच असे नाही. देहाची स्थिती वाईट असूनही या चार कोषांपलीकडे जाण्याची विद्या ज्याला साधली आहे, त्याला जगाच्या दृष्टीने नसतानाही भौतिक सुख आनंदाचा अनुभव प्राप्त होऊ शकेल.

**आनंद, म्हणजेच जीवन :**

आनंद बुद्धीला प्रकाश, मनाला चेतना, प्राणाला जिवंतपणा आणि देहाला सुखानुभवास समर्थ करतो. आनंदामुळे इतर चारही कोष टवटवीत होतात. आनंद नसताना कोमेजतात, निस्तेज होतात. म्हणूनच आनंद सर्वांना प्रिय. आनंद ही प्राणिमात्राच्या जीवनाची पार्श्वभूमी आहे. मात्र हा आनंद सर्व वस्तूंतून सारखाच प्रगट होत नसतो. वनस्पतीतील आनंद दगड मातीतून आढळणार नाही. तसेच इतर प्राण्यांतूनही आढळणार नाही. माणसात व्यक्त होणारा आनंद सर्वाधिक आहे. परंतु माणसामाणसांतही तो कमी अधिक प्रगट होत असतो. माणसाचा अनुभव जितका खोल, व्यापक, अर्थपूर्ण, तितका त्याच्यातून व्यक्त होणारा आनंद शुद्ध स्वरूपाचा असतो.

**आनंदाची श्रेणी :**

देहाचा आराम आणि बाह्य वस्तू उपभोग, यांतच आनंद मानणाऱ्याची श्रेणी निम्न समजावी. हे अगर इंद्रियां पलीकडे ज्याची दृष्टी जात नाही तो मनुष्य रूपाने पशु जीवन जगतो. मनुष्य खपेण मृगा: चरन्ति। ऐश्वर्य, पैसा, घरदार इत्यादिकांत रमणे ही त्यावरील दुसरी पायरी मानावी. ही दुसरी श्रेणी. खेळ, करमणूक, छंद इत्यादींत रमणे ही त्याहून वरची तिसरी पायरी. मित्रांची संगत सामाजिक जीवन जगावेसे वाटणे व जगणे ही चौथी श्रेणी. गायन वादन, चित्रकला, नृत्यनाट्य आदि कलांची उपासना यात रमणे: ही पाचवी पायरी, विज्ञान तत्त्वज्ञान निरनिराळ्या शास्त्रांचे अध्ययन यांत रमणे ही सहावी पायरी, विद्वत्तेपेक्षा शील संपन्नता, जीवनमूल्ये टिकविणे ही सातवी पायरी, थोडक्यात कलावंत, शास्त्रज्ञ, पंडित, शीलसंपन्न पुरुष हे सर्व पहिल्या चार कोषापर्यंतचा आनंद उपभोगतात. आत्मानंद ही शेवटची, आठवी पायरी. संत जनच या पायरीवर आरूढ होतात. सर्व आध्यात्मज्ञानाचे व ते ज्ञान प्रतिपादन करणाऱ्या ग्रंथांचे हेच प्रयोजन आहे. सत् पुरुष दोन प्रकारचे संभवतात. पहिल्या प्रकारात सर्व परिस्थितीत अंतर्यामी पूर्ण समाधानी आणि समचित्त. दुसऱ्या प्रकारात अंतर्यामी अचल राहूनही बाह्य परिस्थिती

बदलणारा. देश काळानुरूप प्रयत्न करणारा. काही आत्मनः मोक्षाय झटतात काही स्वत:च्या मुक्तीबरोबर इतरांचे कल्याण साधतात - आत्मनः मोक्षाय जगत् हितायच।

**साधकासंबंधी काही गोष्टी :**

साधकाच्या अंत:करणात अध्यात्मज्ञान बिंबण्यासाठी तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

१) जगातील साऱ्या घडामोडी ईश्वराच्या इच्छेने घडतात, हा विश्वास दृढ झाला पाहिजे.

२) आपल्या वाट्यास आलेले कर्तव्य प्रामाणिकपणाने आचरणे, हाच श्रेयस्कर मार्ग.

३) कर्तव्याचरणातून प्राप्त होत असलेल्या फळातच समाधान मानणे.

या जाणिवेतून माझा पालनकर्ता, मालक, ईश्वर आहे ही साधकाची निष्ठा तयार होते. मला प्राप्त होणारी परिस्थिती त्याच्या इच्छेने व सकळ कल्याणासाठीच असते ही भावना दृढ होते. कर्तव्याचे फळ तोच देतो व तोच माझा रक्षण कर्ता आहे, याचे नित्य स्मरण होते. ही भूमिका ज्याच्या ठिकाणी तयार होते, असा साधक आत्मानंद मिळवू शकतो.

**मनातील विपरीत कल्पना अज्ञान मूलक :**

मानवी जीवनात नित्य अनेक घटना घडत असतात. त्यांचा अर्थ लावण्याचा मानव प्रयत्न करत असतो. काही गोष्टी उलगडतात, काही ध्यानात आल्यासारख्या वाटतात परंतु उलगडा होत नसतो. ज्यांचा बोध होत नाही व उलगडा होऊ शकत नाही त्यांना दैव म्हणतात. ज्या आपातत: घडतात त्याला आपत्ती म्हणतात. अनेक गोष्टींची उपपत्ती न लावता आल्याने मानव निराश होतो. प्रयत्नांवरील त्याचा विश्वास उडतो. दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसतो. याने स्वत:तील क्रियाशक्ती निस्तेज होते. तो दु:खी, कष्टी व चिडचिडा होतो. अप्रमाणिकतेने वागणारा माणूस भौतिक संपन्न होताना पाहून आपण प्रामाणिकपणे वागून काय मिळविले, फक्त मूर्खपणा पदरी घेतला. असे त्याला वाटते. असा विचार येणे स्वाभाविक आहे. मात्र, हे वास्तविक आहे का याचा विचार केला पाहिजे. ज्याला भोग संपन्नता हीच प्रगती वाटते तो भोग वस्तूंचा संग्रह, विपुल कसे निर्माण होऊ शकेल हाच विचार करतो. या वस्तूंच्या उपलब्धीने सुखी होईन ही त्याची धारणा असते. जीवनमूल्यांची महती त्याच्या ठिकाणी अभावानेच आढळते. जीवन मूल्यांच्या दृष्टीने त्याची ही भौतिक प्रगती गौण ठरते. भल्या बुऱ्या मार्गाने संपत्ती गोळा करणाऱ्या मानवाचे जीवन वरून समाधानी व सुखी दिसते. मात्र वस्तुस्थिती तशी नसते. सतत एक प्रकारचे भय त्याला ग्रासत असते. टांगती तलवार आपल्या डोक्यावर असताना पलंगावर कोणी शांत झोपू शकेल काय? हा सुखाचा आभास म्हणजे प्रगती, असे म्हणावयाचे काय? हे विचारपूर्वक ठरवावे लागेल. हा सुखाचा आभासच त्याला अधिकाधिक दु:खाकडे नेणारा असतो. हे त्याला कळत नाही, हेच त्याचे अज्ञान.

**अंध:कारातून प्रकाशाकडे जा :**

उपनिषदे मानवाला आवर्जून सांगतात - तमसो मा ज्योतिर्गमय। अंधार नव्हे, प्रकाशाकडे जा. अज्ञान नव्हे ज्ञानाकडे जा. क्षणभंगुरतेतून चिरंतनतत्त्वाकडे जा. तरच आपल्या मनातील अज्ञान नष्ट होईल. सुखाभासाऐवजी आनंद पथावर मन धाव घेऊ लागेल. जीवनात खराखुरा आनंद नांदू लागेल. साऱ्या मानवी समस्यांचा अशा प्रकारे निरास करता येईल. जीवनात आनंद हीच सर्वश्रेष्ठ प्राप्ती.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

# लीलावती आणि Hypatia

*लीलावती व Hypatia या दोन गणितातील विदुषींबद्दल माहिती देणारा हा लेख - संपादक*

संत आणि Saits ह्या लेखात ज्या विदुषीचा ओझरता उल्लेख आला होता तिचा आणि तदनुषंगाने भारतातील एका कन्यकेचा अधिक परिचय करून घेऊ या.

भारतीय कन्यका लीलावती प्रकाण्ड आणि श्रेष्ठ गणिती, द्वितीय भास्कराचार्य यांची मुलगी. दुर्दैवाने तिच्यासंबंधीची माहिती मुख्यत्वेकरून आख्यायिकांतून घ्यावी लागते. एक आख्यायिका अशी की, तिच्या वडिलांनी स्वतः काढलेल्या मुहूर्तावर तिचे लग्न व्हावयाचे होते. मुहूर्त अगदी तंतोतंत पाळता यावा म्हणून बुडाशी छिद्र असलेले गडूसारखे एक पात्र पाण्यावर ठेवीत असत. त्या छिद्रातून पाणी आत जाई. ते पात्र पाण्याच्या भाराने बुडेल तो क्षण अतिशुभ मुहूर्त होता. त्याकाळी लग्ने लहान वयात होत असत. वधूवेषात नटलेल्या छोट्या लीलावतीला उत्सुकता वाटली आणि ती त्या पात्रात डोकावून पाहू लागली. तिच्या कर्णभूषणातला एक मोती निखळून त्या पात्रात पडला आणि त्या छिद्रात जाऊन बसला. पात्रात पाणी शिरणे बंद झाले. पात्र बुडण्याची वाट पाहणारे गुरुजी आणि इतर मंडळी खोळंबून राहिली. वेळ तर खूप गेला. शेवटी कुणीतरी ते पात्र उचलून पाहिले. छिद्र बंद झालेले. मुहूर्त टळला. अपशकून झाला. मग ते लग्न झालेच नाही. भास्कराचार्यांनी आपल्या लाडक्या मुलीला गणित शिकवायचे ठरवले आणि घरीच ठेवून घेतले. लीलावती गणितात किती पारंगत झाली, तिने स्वतः गणितावर ग्रंथ लिहिले काय, यासंबंधीची माहिती उपलब्ध नाही. पण लीलावतीला घातलेली गणिते भास्कराचार्यांनी सुंदर पद्यरचनेत ग्रथित केली आहेत; एवढेच नव्हे तर आपल्या ग्रंथाला त्यांनी ''लीलावती'' असे नावही दिले आहे. नमुन्यादाखल एक गणित साध्या बेरीज-वजाबाकीचे.

अये बाले! लीलावती मतिमति ब्रूश्हि सहितान्

द्वि (२) पंच (५) द्वात्रिंशत् (३२) त्रिनवतिशत (१९३) अष्टादश (१८) दश (१०) शतोपेतान् (+१००) एतान् अयुत (१००००) वियुतान्(उणे)-चाऽपि वद मे।

यदि व्यक्ते युक्तिव्यकलनमार्गेऽसि कुशल।।

म्हणजेच ''अग मुली, लीलावती,(तू) बुद्धिमती (आहेस, तर) सांग बरं २, ५, ३२, १९३, १८, १० अधिक १०० (म्हणजे किती?) आणि (ती संख्या) १०००० तून वजा केली तर (काय उत्तर येईल?) सांग बरं, बेरीज-वजाबाकी करण्यात (तू) तरबेज असलीस तर! आणखी एक गमतीचे उदाहरण -

'एक जोडपे प्रेमाने क्रीडा करीत असता तिच्या गळ्यातील मोत्याची माळ तुटली. एकष्ठांश (१/६) मोती जमिनीवर घरंगळले, एकपंचमांश (१/५) अंथरूणात पडले. एक तृतीयांश (१/३) त्या तरुणीने ओंजळीत पकडले, एक दशांश (१/१०) त्या तरुण पतीने पकडले. जर सहा (६) मोती माळेतच राहिले (असतील); तर एकूण मोती किती होते? आणि सांग, १३५ x १२ म्हणजे किती?'

लीलावती हा ग्रंथ १३ खंडांचा आहे. अंकगणित, मुद्दल-व्याज, अंकगणित-भूमितीतील संज्ञा, गणितश्रेणी

(arithmetical progression) भूमितिश्रेणी (geometric progression) समतल भूमिती (plane geometry), घनभूमिती (solid geometry) सावल्या (shadow) आणि छाया-घटिका यंत्रे (gnomons) आणि कुट्टक (inderterminate equations) सोडविण्याची पद्धत हे त्यातील विषय आहेत. भास्कराचार्य-लीलावती यांचा काळ इ.स. १२ वे शतक.

आणि ग्रीक तरुण, सुदंर, गणितज्ज्ञ, ग्रंथकर्ती युवती Hypatia. तिचा काळ इ.स. चौथे-पाचवे शतक. त्या काळात ईजिप्तमधील ॲलेक्झाण्ड्रियात एक प्रचंड वस्तुसंग्रहालय आणि ग्रंथालय होते. आपल्याकडील नालंदा येथील ग्रंथालयाप्रमाणे. Hypatia चे वडील Theon, अलेक्झाण्ड्रियाच्या ग्रंथालयाशी संबद्ध महान् गणिती. Hypatia स्वतः Platonist school ची प्रमुख होती. ती तत्त्वज्ञान आणि गणित शिकवीत असे. तिच्या नावावर तीन ग्रंथ आहेत.

1) Arithmetic of Diophantus वरील १३ खंडीय भाष्य

2) Conics of Apollonius वरील भाष्य

3) स्वतंत्र ग्रंथ The Astronomical Canon.

आणखीही काही असावेत.

ती Pagan होती. जे ज्यू आणि ख्रिस्ती नाहीत ते Pagan, ज्याप्रमाणे जे मुस्लीम नाहीत ते काफिर. ते बहुदैवतवादी होते. ज्यूडाइझम आणि येशूखेरीज कुणी तारणहार आहे असे मानणे महापातक ठरले. सॉक्रेटिस-प्लेटो-ॲरिस्टॉटल हे सगळे अर्थातच pagan होते. पण ख्रिस्तोत्तरही pagan सर्वत्र होतेच. त्यांचे तत्त्वज्ञान उच्च होते, संस्कृती प्रगल्भ होती आणि सहिष्णुता हिंदूसारखीच; पण ख्रिस्त्यांनी pagan, heathen ह्या शिव्या ठरविल्या. अर्थात, त्यांना बाटवणे किंवा ठार मारणे हे परमकर्तव्य. त्या परमकर्तव्याच्या पालनात बळी पडली सुंदर तरुण, प्रकांडविदुषी Hypatia.

देशोदेशींचे ज्ञानपिपासू विद्यार्थी तिच्याकडे गणित आणि तत्त्वज्ञान शिकायला येत असत. Hypatia प्लॅटोनिस्ट पीठांची प्रमुख होती, अर्थातच ती Platonism शिकवत असे. आणि ते तत्त्वज्ञान तर बायबलबाह्य. तिचे पांडित्य आणि विद्यार्थिप्रियता तेथील बिशप Cyril ह्याच्या डोळ्यात खुपू लागली. हा सीरिल म्हणजे मरणोत्तर चर्चने प्रमाणपत्र देऊन Saint पदवीला पोचविलेला St. Cyril of Aleccandria, जशी आपली Mother Teresa of Calcultta. त्याचा काळ इ.स. ३७६ ते ४४४. त्यांची बिरुदावली Church Father, Doctor of the church, Pillar of Faith, and Seal of all Fathers नंतर ४१२ ते ४४४ तो पोपही झाला. बरं, गंमत अशी की ख्रिस्ती रिलीजन मधलाच एक उपपंथ Nestorian. दोघांचीही मूलभूत विचारसरणी सारखीच.

मी जो मानतो तोच देव, बाकी मानतात तो देव नव्हे, एवढेच नाही तर तो Devil, दैत्य. तर ह्या नेस्टोरियन मंडळींनी बिशप सीरिलला दिलेली बिरुदे - Heretic (पाखंडी), 'A Monster, born and educated for the destruction of the Church' - वगैरे. एवंगुणा-विशिष्ट, तेव्हाचा बिशप, नंतर Pope आणि Saint झालेला सीरिल. त्याने ज्यूंना आणि pagan लोकांना ॲलेक्झांड्रियाबाहेर हाकलून दिले. Hypatia तर pagan पीठाची अध्वर्यू. सीरिलने Nitrian साधूच्या नेतृत्वाखाली कॅथॉलिक गुंडांचा एक जमाव Hypatia च्या पारिपत्यासाठी पाठविला. त्यांनी Hypatia ला रथातून खाली खेचले, शंखांच्या टोकादार आणि धारदार तुकड्यांनी तिची कातडी सोलून काढली. तिला भर रस्त्यात नग्न करून फरफटत नेली जिवंत जाळली.

भास्कराचार्यांनी आपल्या मुलीला गणित शिकविले, तिचे नाव आपल्या ग्रंथाला दिले. 'लीलावती' ग्रंथाच्या शेवटच्या श्लोकात भास्कराचार्य म्हणतात, 'अपूर्णांकांचे मूळ रूप, गुणाकार, संख्यांचे वर्ग, घन, वर्गमूळ, घनमूळ इत्यादी काढण्याच्या पद्धती वगैरे अलंकारांनी जिचे अवयव सुशोभित झाले आहेत अशा ह्या 'लीलावती'ला जे कंठाशी धारण करतील (श्लेष :- गळामिठी मारतील, अभ्यासून कंठगत करतील) त्यांच्या सुखाला आणि आनंदाला पारावार नाही'

एकीकडे ज्ञानाचा परमादर तर दुसरीकडे ज्ञानाचा विखारी हिंसक विद्वेष!

(वरील सर्वां विषयी विस्तृत माहिती Internet वर उपलब्ध आहे.)

**डॉ. बाळ गांगल**
५०१, दूर्वांकुर, डीएस्के,
रानवारा, एन्डीए - पाषाण रोड,
बावधन, पुणे - ४११ ०२१

●●●

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयातील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

गेल्या दहा वर्षांत प्राथमिक संदर्भ साधनांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. यांत १९५१ साली सुरु झालेल्या 'हिस्ट्री टुडे' (History Today) सारख्या महत्त्वाच्या नियतकालिकांच्या डिजिटायझेशनचाही (संगणकीकरणाचा) समावेश आहे. ही सर्व साधने सहज प्रतिप्राप्त (रीट्राइव्ह) करता येतील अशा इलेक्ट्रॉनिक स्वरूपांत आहेत. त्यासाठी हस्तलिखितांचे स्कॅनिंग, छायाचित्रांचे संगणकीय रूपांतरण व मौखिक इतिहासाचे ध्वनिरूपांतरण या सर्व तंत्रांचा वापर करण्यात आला आहे. यांतील बरेचसे साहित्य महाजालावर आहे, तबकड्यांच्या रूपात आहे. त्यामुळे सहज उपलब्ध आहे. परिणामी संशोधनात या साहित्याचे संदर्भ आता अनिवार्य ठरत आहेत. याबाबतचे सोदाहरण विवरण 'व्हर्च्युअली लिमिटलेस लायब्ररी' या लेखात निक पॉइनटझ् यांनी हिस्ट्री टुडेच्या अंकात केले आहे.

**संदर्भ :** हिस्ट्री टुडे: जून १०: खंड ६०: क्र. ६ पृ. ५५

# एक ऐतिहासिक घटना एका ऐतिहासिक शहरात

*गों जाऊ या चीन मधील ऐतिहासिक शहराचे हे वर्णन डॉ. आगरकर यांनी या लेखात केले आहे. - संपादक*

किशोरवयीन वयातील विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देण्यासाठी चीनमध्ये दरवर्षी नवनिर्मिती स्पर्धा आयोजित करण्यात येते. चीनची किशोरांसाठी विज्ञान तंत्रज्ञानातील नवनिर्मिती स्पर्धा (China Adolescent Science and Technology Innovation Contest) असे त्या स्पर्धेचे लांबलचक नाव आहे. चीनची विज्ञान आणि तंत्रज्ञान संघटना (China Association of Science and Technology) या स्पर्धेचे आयोजन करते. इसवी सन १९८० पासून नियमितपणे या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. १९९० पर्यंत दर दोन वर्षांनी स्पर्धा घेतली जायची. १९९१ पासून मात्र त्याचे आयोजन दरवर्षी करण्यात येत आहे. ऑगस्ट २०१० मध्ये आयोजित करण्यात आलेली स्पर्धा २५ वी होती. याचाच अर्थ, ही रजत महोत्सवी अशी ऐतिहासिक घटना होती. ऐतिहासिक घटनेला आवश्यक असते ऐतिहासिक स्थळाची. चीन विज्ञान तंत्रज्ञान संघटनेने या ऐतिहासिक घटनेसाठी चीनच्या एका ऐतिहासिक शहराचीच निवड केली. त्या शहराचे नाव गोंजाऊ (Guangzhou) असे आहे.

चीनच्या भूप्रदेश फारच मोठा आहे. तिचा दक्षिण किनारपट्टीचा भाग पॅसिफिक समुद्राला जोडलेला आहे. याच दक्षिण किनारपट्टीवर गोंजाऊ हे शहर वसलेले आहे. चीनमधून वाहणारी पर्ल नदी याच ठिकाणी समुद्राला मिळते. नदीच्या मुखापाशी नदीचे पात्र खूप विस्तृत होते. त्याचबरोबर एका पात्राची अनेक पात्रे तयार होतात. नेमकी ही बाब पर्ल नदीच्या मुखापाशी झालेली आहे. त्यामुळे समुद्राजवळ लहान लहान बेटे तयार झालेली आहेत. गोंजाऊ शहर मूळ भूपृष्ठावर आणि या बेटांवर वसलेले आहे. नवनिर्मिती स्पर्धेचे आयोजन गुआंगडाँग विज्ञान केंद्रात करण्यात आले होते. हे केंद्र नदीच्या पात्रामुळे तयार झालेल्या शिगुवी (Xiaoguewei) बेटावर बांधलेले आहे. या केंद्राची रचना, त्याचा आजूबाजूचा परिसर याबद्दल वेगळ्या लेखात माहिती दिलेली आहे. या लेखात आपण गोंजाऊ शहराच्या ऐतिहासिक महत्त्वाबद्दल पाहू या.



**शिगुवी बेट**

रेशीम पथ (Silk Route) ही इतिहासातील एक महत्वाची बाब आहे. हा पथ बराचसा जमिनीवरच होता. परंतु त्या पथाचा काही भाग समुद्रातूनदेखील जात असे. समुद्रातून जमिनीवर जेथे हा पथ यायचा नेमका त्याच ठिकाणी गोंजाऊ शहर वसलेले आहे. त्यामुळे व्यापार आणि उद्योगाची भरभराट या शहरात प्राचीन काळापासून झाली. चीनने देखील आपल्या देशाचा विकास करावयाचे ठरविले. त्याची सुरुवात याच शहरापासून केली. सर्वप्रथम गावातील रस्ते सुधारले. त्यानंतर शहरापासून बाहेर जाणारे रस्ते बांधले. सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उड्डाणपूल बांधून रहदारी सुरळीत होत राहील याची काळजी घेतली. शहराजवळच विशेष

स्थापना करून परदेशांतील अनेक प्रसिद्ध कारखान्यांना तेथे उद्योग उभारण्यासाठी पाचारण केले. शहरातच मालधक्का असल्याने कारखान्यात निर्माण झालेला माल सहजपणे दुसऱ्या देशात पाठविता येऊ शकत होता. त्यामुळे शहराचा आणि आजूबाजूचा विकास फारच झपाट्याने झाला. शहरातील गगनचुंबी इमारती याची साक्ष देतात. त्याचबरोबर शहरातील घाऊक बाजारपेठ या परिसरात किती वेगवेगळ्या वस्तू बनविल्या जातात याची साक्ष देतात. या बाजारपेठेत इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, फर्निचर, कापड, खेळणी याचबरोबर घरात वापरावयाच्या टाईल्स आणि बाथरूम फिटींगची मोठमोठी दुकाने आहेत. भारतीय व्यापारी मोठ्या संख्येने या शहरात येतात. घाऊक बाजारात खरेदी करतात आणि भारतात आणून किरकोळ रूपात विकतात.



**गोंजाऊ शहराचे दृश्य**

विद्यापीठासाठी निर्माण केलेला स्वतंत्र आणि प्रशस्त परिसर हे गोंजाऊ शहराचे आणखी एक वैशिष्ट्य सांगता येईल. मूळ शहरापासून जरा दूर विद्यापीठाची निर्मिती करण्यात आलेली आहे. या परिसरात वेगवेगळी विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्था आहेत. दक्षिण चीन तंत्रज्ञान विद्यापीठ (South China University of Technology) हे त्यांपैकीच एक. त्याचबरोबर वैद्यकीय विद्यापीठ, कला विद्यापीठ अशी अनेक विद्यापीठे या परिसरात आहेत. त्यामुळे या परिसराला विद्यापीठ शहर (University Town) असेच म्हणतात. विद्यापीठाची आखणी अतिशय पद्धतशीरपणे केलेली आहे. शैक्षणिक प्रभाग, प्रयोगशाळा, वसतिगृहे, कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी घरे याचबरोबर विद्यापीठात कामासाठी येणाऱ्या व्यक्तींना राहण्यासाठी हॉटेलदेखील बांधून ठेवलेले आहे. सर्व सुविधांनी युक्त अशा या हॉटेलात सभा, संमेलने यासाठी मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या व्यक्तींची चांगली सोय होईल, याची काळजी घेण्यात आलेली आहे.

चीनचा समाजवाद (Communism) सर्वांनाच माहीत आहे. समाजवादची सुरुवात १९१० च्या दशकात झाली. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर चीनमध्ये क्रांतीचे वारे वाहू लागले. या क्रांतीचे जनक होते सन यात्सेन (Sun Yat-Sen). गोंजाऊ शहराच्या जवळच असलेल्या झोगशान (Zhogshan) या लहानशा खेड्यात एक शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यावेळेस चीनमध्ये राजेशाही अस्तित्वात होती. संपूर्ण देश लहानलहान राज्यांत विभागलेला होता. वेगवेगळ्या राज्यांमधील लढाया ही तर नित्याचीच बाब होती. त्याचबरोबर राजा आणि त्यांची माणसे यांच्या प्रजेवरील अन्यायाने सामान्य जनता कंटालेली होती. या पार्श्वभूमीवर हवाई बेटावरून शिक्षण घेऊन परत आलेल्या तरुण सन यातसेनच्या डोक्यात क्रांतीची ठिणगी पडली. त्यांनी शेतकरी आणि कामगार यांना एकत्र करून राजेशाहीविरुद्ध बंड पुकारले. या बंडाची सुरुवात नेमकी याच शहरापासून झाली. शेतकरी आणि कामगारात असलेल्या असंतोषाला खतपाणी देऊन त्यांना बंडासाठी तयार करणे हे महत्वाचे काम होते. त्यासाठी त्याने अनुयायी तयार केले. त्या अनुयायांना प्रशिक्षण याच शहरात दिले जायचे. यासाठी वापरली जाणारी जागा चीन सरकारने सुरक्षित ठेवली असून तेथे एक चांगले प्रदर्शन भरविलेले आहे. केवळ बंड करून काम भागत नाही. राजाच्या सैनिकांविरुद्ध लढण्यासाठी सैनिकांची फळी देखील असण्याची गरज सन यात् सेनने

ओळखली. त्यासाठी त्यांनी सैनिक संस्थेची (Military Academy) स्थापना केली. ती देखील या शहरातच.



**मिलिटरी ॲकॅडेमी**

चीन विज्ञान तंत्रज्ञान संघटना यांच्या निमंत्रणावरून स्पर्धेत भाग घेण्यासाठी आम्ही गोंजाऊला गेलो होतो. ठाण्याच्या सौ. ए. के. जोशी शाळेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेला एक प्रकल्प आम्ही सोबत नेला होता. त्या प्रकल्पाचे नाव समस्येविना वाहन (No Problem Car) असे होते. पुढे एखादे वाहन किंवा वस्तू आली तर वाहन आपोआप थांबेल, सिग्नल तांबडा असेल तर इंजिन बंद



**बक्षिसपात्र भारतीय विद्यार्थी**

करेल आणि ठरवून दिलेल्या जागेत गाडी पार्क करता येईल अशी व्यवस्था या प्रकल्पात करण्यात आली होती. या प्रकल्पाला आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विशेष प्रावीण्य (Outstanding Achievement Award) देण्यात आले.

भारताखेरीज ११ देश या स्पर्धेत सहभागी झाले होते. या सर्वांची राहण्याची व्यवस्था विद्यापीठाच्या हॉटेलमध्ये करण्यात आली होती. त्याखेरीज त्या सर्वांना वर उल्लेखिलेली अनेक ठिकाणे दाखविण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे गोंजाऊ शहराचे स्वरूप जवळून पाहता आले.

या नोव्हेंबर माहिन्यात याच शहरात अशिया खेळ स्पर्धा (Asian Games) व्हायचे आहेत. त्याची उत्तम तयारी शहरवासियांनी केलेली आहे. अगदी उद्या जरी खेळाची स्पर्धा घ्यायची असेल तरी त्यांची तयारी आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने त्यांनी एक नवीन दूरचित्रवाणी मनोरा (Television Tower) उभा केलेला



**नव्याने उभारलेला मनोरा**

आहे. या मनोऱ्याचे उद्‌घाटन आशिया खेळ स्पर्धेच्या निमित्ताने करण्याचा त्यांचा मानस आहे. मनोऱ्याची नेमकी उंची किती ही माहिती देखील त्याचवेळी जाहीर करण्यात येणार आहे. सद्या शांघाय येथील दूरचित्रवाणी मनोरा सगळयात उंच आहे. या मनोऱ्याची उंची जवळजवळ तेवढीच किंवा त्यापेक्षा थोडीशी जास्त असावी असे वाटते. असे जर असेल तर या ऐतिहासिक शहराला आणखी एक ऐतिहासिक महत्व प्राप्त होईल.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी, कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण जि. ठाणे - ४२१२०४

सगळ्या विश्वाच्या कल्याणाचा विचार भगवंत करतात.

# सलाम हिंदवी स्वराज्याला

*विविधतेत एकता टिकवणारे आपले स्वराज्य. या स्वराज्याची उत्सवप्रियता ही एक अंत: प्रवाह तयार आहे. त्याबद्दल हे विचार – संपादक*

आसेतु हिमाचल पसरलेला भारत माझा देश आहे. भारत माझी मातृभूमी आहे. मी भारतीय आहे याचा मला अभिमान आहे. माझ्या देशाला हजारो वर्षांची गौरवशाली परंपरा आहे. गंगा, यमुना, सरस्वती, नर्मदा, सिंधू, कावेरी, गोदावरी या नद्यांनी आपल्या जलाने या भूमीला पावन केले आहे. विद्या वाचस्पती श्री. शंकर अभ्यंकर म्हणतात, 'हे विश्व म्हणजे एक घर आहे. इतर देश म्हणजे घरातील वेगवेगळी दालनं आहेत, जसे स्वयंपाकघर, बैठकीची खोली, जेवणघर, पाहुण्यांची खोली, अभ्यासाची खोली, झोपण्याची खोली, कोठीघर वगैरे. पण भारत हे त्यांतील देवघर आहे. अशा पवित्र देशात माझा जन्म झाला हे माझे परमभाग्य आहे.

माझा धर्म हिंदू हा जगातील प्राचीन धर्म आहे. पण इतर धर्मांचाही आदर करावा हे गीतेचे वचन आम्ही पाळतो. सर्वांशी प्रेमाने वागतो. सगळी माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. ''वसुधैव कुटुंबकम्'', ''हे विश्वची माझे घर'', ''जेथे जातो तेथे माझी भावंडे आहेत'' असे आम्ही मानतो. 'जे जे भेटे भूत त्यासी मानी भगवंत' याचे आम्ही पालन करतो. भारत देश हा मानवतेचा महासागर आहे. अनेक वंश, धर्म, जाती इथे गुण्यागोविंदाने वास करतात.

'भगवद्गीता' हा आपला धर्मग्रंथ आहे. इहपर कल्याणाचा मार्ग सांगणारा, जीवनाचे आचरणशास्त्र म्हणजे गीता असे राष्ट्रसंत विनोबा भावे यांनी म्हटले आहे. अलौकिक तत्त्वज्ञानाचा हा ग्रंथ विश्वमान्य आहे. भारतीय संस्कृतीचा आत्माच असलेले 'रामायण' 'महाभारत' हे तर आमचे राष्ट्रीय धर्मग्रंथ आहेत. 'रामायण' हे मधुर नीती काव्य आहे आणि 'महाभारत' हा समाजशास्त्र, इतिहास सांगणारा ग्रंथ आहे. ही सर्व ग्रंथसंपदा, वेद, उपनिषदे, श्रुती-स्मृती, पुराणे हे सर्व प्राचीन वाङमय संस्कृतात आहे. संस्कृत ही सर्व भाषांची जननी आहे. म्हणून ती केवळ भारतीयांचीच भाषा नव्हे तर सर्वांची भाषा आहे.

हिंदूंची वसती असलेल्या देशास पूर्वी हिंदुस्थान म्हणत. १९४७ ला देशाची फाळणी झाली नि नंतर हिंदुस्थानला 'भारत' हे नाव दिले गेले. हिंदू धर्मात सण आणि उत्सव यांची रेलचेल आहे. त्यामुळे भारत भूमी ही उत्सवभूमी झाली. उत्सव प्रियता हे आमचे वैशिष्ट्य आहे. पाठोपाठ येणाऱ्या सणांनी नि उत्सवांनी संबंध वर्ष चैतन्याने भरून जाते. आपले नातेवाईक, बांधव सर्व त्यामुळे एकत्र येतात. त्यामुळे प्रेमाचे नाते अतूट राहते. प्रसंगी देवदेवही होते, मांगल्याची, पावित्र्याची, भाव भक्तीची प्रचिती येते. सणांची नि उत्सवांची एवढी विविधता आणि खैरात अन्यत्र कोठेही नसेल. हिंदू धर्माचे हे वैशिष्ट्य आहे. यामुळे मन प्रसन्न राहते आणि जीवन बहुरंगी बनते. खरोखर आपल्या पूर्वजांच्या कल्पकतेची कमाल आहे. आपले सण ऋतुमानाप्रमाणे आरोग्याला पोषक आहेत. उत्सव व सण प्रांतापरत्वे भिन्नभिन्न आहेत. भारतात इतर धर्मीयांचे सण सुद्धा प्रेमाने सामंजस्याने साजरे होतात.

हिंदू वर्षाचे बारा महिने वसंत, ग्रीस्म, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिर या सहा ऋतूंत विभागले आहेत. पण

आज आपली संस्कृती इंग्रजाळलेली आहे. त्यामुळे नवीन पिढीला ह्या सर्वांची माहिती करून द्यायला हवी. ''हॅपी बर्थ डे टू यू'' म्हणत आज आपण इंग्रजी पद्धतीने केकवर लावलेल्या कॅनडस्स् फुंकून विझवतो. पण आपली ही संस्कृती, पद्धत नाही. आपण प्रकाशाचे तेजाचे पूजक आहोत. आपण दीपाला प्रज्वलित करतो, विझवत नाही. 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही आपली संस्कृती आहे. आपण लोक 'ख्रिसमस' धडाक्यात साजरा करतो. तो पाश्चात्त्यांचा सण असला तरी. ३१ डिसेंबरला पार्टी करून जागून आपण नवीन वर्षाची सुरुवात इंग्रजी वर्षाप्रमाणे 'Happy New Year' म्हणून आनंदाने एकमेकांना शुभेच्छा देऊन साजरी करतो, हे आपल्या परंपरेत नाही.

गेल्या काही वर्षापासून आपल्या हिंदू संस्कृतीला जरा जाग येऊ लागली. नि आपली भारतीय परंपरा आपण का नाही राखायची! या विचाराने डोके वर काढले.

चैत्र शुद्ध प्रतिपदा हा हिंदू धर्माचा वर्षारंभाचा दिवस. यालाच गुढीपाडवा म्हणतात. साडेतीन मुहूर्त जे आपल्यात अत्यंत पवित्र मानले जातात, त्यांतील हा एक मुहूर्त. दुसरा अक्षय्य तृतीया. विजया दशमी दसरा हा तिसरा आणि चौथा अर्धा मुहूर्त बलिप्रतिपदा म्हणजे दिवाळीतला पाडवा. चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू रामचंद्र आपला चौदा वर्षाचा वनवास संपवून आणि रावण वध करून अयोध्या नगरीत प्रवेश करते झाले. त्यावेळी सर्व अयोध्या गुढ्या, तोरणे, रांगोळ्या, केशर सडे घालून रामप्रभूंच्या स्वागताला आले. सर्व नगरवासी या आनंदोत्सवात सहभागी झाले. तो हा गुढी पाढवा. त्याची परंपरा रामायणापासून चालत आलेली. आपणही आता हा गुढी पाडवा नगरोत्सव म्हणून सामूहिकरीत्या साजरा करतो. घराघरावर, चौका चौकांवर गुढ्या, तोरणे उभारत, रांगोळ्यांनी सुशोभित करून. ३१ डिसेंबर प्रमाणे गुढी पाडव्याच्या आदल्या दिवशी सगळे नगरवासी एकत्र जमून फटाक्यांची आतषबाजी करतो. दुसऱ्या दिवशी नव वर्षाची गुढी उभारण्यासाठी आनंदोत्सव साजरा करण्यासाठी. या दिवशी सर्व धर्मीय या शोभा यात्रेत नववस्त्रे आभूषणे लेवून आपल्या पारंपरिक वेषात सहभागी होतात. भारतीय संस्कृतीतला अन्ययसाधारण अद्वैत भाव म्हणजे आपल्या व परमात्म्याच्यातील ऐक्याची भावना अनुभूती इथे प्रत्ययाला येते, दृगोचार होते.

आपल्या संस्कृतीवर अनेक परकीय आक्रमणे झाली, तरी ती टिकून आहे. 'स्वतंत्रते भगवती त्वामहं, यशोहुतां वन्दे' असे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हणूनच म्हटले आहे. जगात जे जे सत्य, शिव, सुंदर दिसेल, महान-आदरणीय असेल त्याला पूजणारी अशी संग्राहक, गुणग्राहक, प्रेरक अशी आमची भारतीय संस्कृती आहे. सर्वसमावेशक, भारतात वर्षभर हिंदूंचे सण, उत्सव, जयंत्या, पुण्यतिथ्या दर महिन्यात साजऱ्या होतातच; पण इतर धर्मीयांचे सण सुद्धा साजरे केले जातात. मौजमजेबरोबर परमेश्वराबद्दलचा भक्तिभाव पण त्यातून प्रगट केला जातो. 'सर्वाभूती परमेश्वर' अनेकतेत एकता 'हारमनी' सर्व चराचरात भरून उदलेलं ते एकच एक परमात्मतत्व. कोणीही सहृदय हिंदू धर्मातील सण संस्कृतीशी सहज समरसून जाईल त्याच्या प्रेमातच पडेल अशीच आहे ती. त्या हिंदू धर्माला सलाम, त्या संस्कृतीला सलाम, त्या हिंद वासियांना सलाम!!

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०/९३२४०४४७६४

●●●

# संत साहित्यातील काही 'कण' आणि काही 'क्षण'

*विनोबा भावे यांच्या संत साहित्याच्या संदर्भावरुन तयार केलेल्या लेखमालेतील हा गोस्वामी तुलसीदास यांच्या संदर्भातील लेख - संपादक*

**गोस्वामी तुलसीदास :**

जन्म - उत्तर प्रदेशातील बांदा जिल्हा - राजापूर गावी झाला. काळ - (मनभिन्नता) सन १४९७-१५३२ माता - 'हुलसी' पिता 'आत्माराम दूबे' हनुमानभक्त

**दृष्टांत :**

''चित्रकूट के घाटपर भइ संतन की भीर,

तुलसिदास चंदन घिसे तिलक देत रघुवीर''

तुलसीदासांचे लेखन प्रारंभी संस्कृतात असे. परंतु दिवसा लिहिलेले रात्री लुप्त होई. श्री शंकराने दृष्टांत दिला की आपल्या भाषेत लिही. त्यानुसार,

सन १५७४ त अयोध्येस रामनवमीस 'रामचरित्र मानस' चे लेखन सुरू केले. ते सन १५७६ मध्ये पूर्ण झाले. त्यांनी काशीस जाऊन विश्वनाथजींना अर्पण केले. तेथे हनुमानजींची आज्ञा होउन 'विनय पत्रिका' लिहिली. १६२३ मध्ये तुलसीदासांनी 'अस्सी' घाटावर देह विसर्जित केला.

इतिहास सांगतो की, गौतम बुद्धानंतर उत्तर हिंदुस्थानात कबीर व तुलसीदास यांचेच नाव झाले. मात्र विनोबांच्या मते तुलसीदासाचे नाव लोकांच्या मुखी अधिक गेले; कारण त्यांचे असामान्यत्व व रामायणाचा प्रभाव असामान्य होता. त्यास हिंदीत तोड नाही. महाराष्ट्रात ज्ञानेश्वर तसे उत्तर हिंदुस्थानात तुलसीदास.

'राम ते आधिक राम कर दासा' या पंक्तीतून कळते की वाल्मिकीमुळे जगदुद्धार झाला. रामकथा भक्तापर्यत पोहोचली. गंगेचा प्रवाह हिंदुस्थानाच्या काही भागातून वाहतो. मात्र रामायण कथा सर्व भारतभर पोहोचली. म्हणून वाल्मिकी रामापेक्षा ही मोठे ठरतात. राम नसते तर वाल्मिकी नसते, पण वाल्मिकी नसते तर आम्हा भक्तांपर्यत रामायण कसे पोहचते? तुलसीदासांची रामकथा गरीबांच्या झोपडीपर्यत पोहचली आहे.

उत्तर प्रदेशात तुलसीदास जनहितकारी म्हणून सर्वांत महान ठरले. रामायणाची उपासना भारताच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलेली दिसून येते.

मलबारच्या कोपऱ्यातला शूद्र भक्त- 'एळुत्तच्छन्' महाकवी यांनी 'मलयालम्' मध्ये रामायण लिहिले.

'तामिळ' भाषेचे महाकवी 'कंबन' यांनी रामायण तामिळीत लिहिले. गुजरातेत 'गिरीधर' नी व बंगालमध्ये 'कृत्तिवास' ते रामकथा गायिली. महाराष्ट्रात 'एकनाथांचे' नाव प्रसिद्ध आहेच. एकनाथ व तुलसीदास समकालीन होते. तुलसीदास एकनाथांपेक्षा एक वर्षाने मोठे. असून रामभक्त, तर एकनाथ कृष्ण भक्त होते.

लेखनाच्या निमित्त दोघांचे वास्तव्य काशी घाटावर असे. उपरोक्त कवींच्या काव्यातील शैलीची तुलना शेक्सस्पिअरबरोबर करता येईल मात्र 'तुलसी रामायणाची' बरोबरी होऊ शकत नाही. कारण त्यांत अध्यात्माबरोबरच भक्ती अधिकांश आहे.

तुलसीदासांचे अद्विितियत्व यातच आहे. किसानापासून विद्यापीठीय अभ्यासापर्यत त्याचा प्रसार झाला आहे. हे कसे?

कारण तुलसीच्या रामकथेतून आत्मानंद आणि आश्वासकता लाभते. स्वत:ला अत्यंत खालच्या पायरीवरचे समजतात. नम्रतेची ही परिसीमा होय. अहंता नाही. मनात नाही म्हणून वाणीत नाही. म. गांधीजीनी दरिद्रीनारायणाचे प्रतिनिधित्व आमरण केले. तुलसीदासांनी पापीचे केले. विश्वाचे सुख पाहिले.

''स्वान्तसुखाय तुलसी रघुनाथगाथा भाषा निबंधमति मंजुलमातनेति''

''जे जनमे कालिकाल कराला। करत ब बायस बेष मराला''कलियुगात जन्मला ज्याचे आचरण कावळ्यासारखे आहे हे वर्णन पतितांचे आहे. तुलसीदास पुढे लिहितात, 'तिन्ह महँ प्रथम रेख जग मोरी ' अशा लोकांत प्रथम माझे नाव लिहा.

नामु राम को कल्पतरु कालि कल्यान निवासु।

जो सुमिरत भयो भाँग ते तुलसी तुलसी दासु।।

केवळ स्मरणाने, नावाच्या स्मरणाने भांगेतून तुलसी जन्मते-उद्धरते. रामाने अत्यंत पापी व्यक्तीला भक्त म्हणून तुलसीदासाला निवडले.

मोगल राजा अकबराच्या राज्यात भौतिक सुखे होती. राजा चरित्र्यवान, शीलवान, प्रजाहितदक्ष होता. तुलसीदास ही त्याच राज्यात होते. तुलसी वर्णितात समाजात सर्व काही असले तरी समाज अधोगतीला चालला होता. परस्पंरात प्रेम नाही, सहकार नाही अशी पतितावस्था होती. कारण 'आध्यात्मिक' सुख नव्हते.

रामराज्यात प्रजा सुखी असते. सीता आल्यावर 'शंका' निर्माण झाली. आश्चर्यजनक सीतेच्या आदर्शाहून आधिक काही नसतेच. का? उत्तर असे की राजसत्ता जनतेचे उत्थान करू शकत नाही. राजसत्ता क्रांती करू शकते बुद्धाने राज्य सोडले. लोकांच्या हृदयासाठी स्फूर्ती दिली. शुद्धी केली.

केवळ आर्थिक सुख सुधारणेने भागणार नाही. नैतिक उत्थान हवे. राजसत्ता हे नैतिक उत्थान करू शकत नाही. अकबराच्या राज्यात सर्वत सुख शांती असूनही समाज अवस्था कशी होती त्याचे वर्णन तुलसीदास करतात, समाज अधोगतीला चालला आहे, तुलसीदास मार्गदर्शक होत. राजा अकबर नव्हे. त्यामुळे इतिहासकार लिहितात 'अकबराच्या काळी तुलसीदास होऊन गेले हे उचित नव्हे. कारण जमाना अकबर का नही था, तुलसीदासजी का था' असे लिहायला हवे.

१३ व्या शतकात महान कोण होते? कर्नाटकात 'विद्यारण्य' तर पंजाबात 'नामदेव' काम करीत होते. तथापि, इतिहासकार राज्यांची नावे लिहितात. अगदी परवा पर्यतचे  उदा. घेतले तरी पं. नेहरूंनी लिहिलेल्या इतिहासात अकबराबद्दल बरेच काही असून तुलसीदासां-बद्दल दोन चार ओळीच आहेत. राजे आले आणि गेले. परंतु कबीर, नानक, नामदेव, यांची नावे लोकांच्या हृदयात आहेत. काश्मीरातील समाजावर आत्मज्ञानी योगिनी 'ळल्ला' स्त्रीचा प्रभाव होता. हिंदु-मुसलमान दोहोंवर काश्मीरला दोनच नावे माहीत एक 'अल्ला' दुसरा 'लल्ला'।

हिंदुस्थानात सर्वमान्य राजा एकच, 'राम राजा'! संतावलीत गुरूनानक, मीरा तुलसीदास, महावीर, म. बुद्ध, ज्ञानदेव, नामदेव, पुरंदर, शंकर, रामानुज, पावन नामावली तारक नामावली. तुलसीदासांना साहित्याकांच्या दृष्टीतून केवळ पाहू नये. त्याहून महान लोकहितकारी धर्मपुरुष म्हणून पाहावे. त्याहूनी ते ज्ञानी भक्त होते.

लोक तुलसीदासांची जयंती उत्सव साजरी करतात. निबंध-कविता-शायरी करुन रामायणातील पात्रांचे चित्रण चर्चा करुन साजरी करतात. मात्र तसे करणे योग्य नव्हे. हे आम्रफळाचा रंग व आकार बघण्यासारखे ते आहे. फळ चाखून पहाणे महत्वाचे! तुलसी रामायणाची श्रेणी भक्त गणात उंच हवी. साहित्यिकांत नव्हे तुलसीदास कवींमध्ये महान होते. परंतु ते 'भक्तशिरोमणी' होत हे लक्षात घ्यायला हवे.

प्रसिद्ध साहित्यिकांत कुणाची पहिलीच कृती उत्तम असते तर कुणाची अंतिम कृती उत्तम असते. वर्डस्वर्थ कवीची प्रारंभिक कृति उत्तम होती मारोपंतांची अंतिम कृती महत्वाची मानली जाते. तथापि, तुलसीदासांची पहिली व अंतिम दोन्ही कृती उत्तम होत्या.

काशी घाटावर लोकांनी तुलसीदासांना सतावले. ते दुसरीकडे गेले. माणिकर्णिकाकडे. तेथेही त्रास होताच. वेगवेगळ्या पंथांच्या लोकांनी त्रास दिला. शेवटी काशीच्या शेवटच्या घाटावर गेले. तुटक्या-फुटक्या जागी 'अस्सी' घाट तेथेच आरामात (स्वस्थपणे) लेखन पूर्ण केले, असे हाल सर्व संतांचे झाले. तुलसी रामायण व वाल्मिकी रामायण यात फरक? खरे पाहू जाता तुलसी रामायणाच्या काळी प्रचाराची साधने नव्हती तरी घराघरातून 'रामकथा' गेली. ४५ व्या वर्षी तुलसी रामायण लिहिले.

''तुलसी तव तीर तीर सुमिरत रघुवंश वीर विचरत'' गावोगाव जाऊन मधुर वाणीने रामकथा गान ऐकवली प्रचार केला.

अध्यात्म रामायण, प्रसन्नराघव, हनुमन्नटक, रघुवंशाचे सारग्रहण यावर भागवताची छाप दिसून येते. वाल्मिकी रामायणाचा मूळ आधार असला तरी तुलसी रामायणात 'भरतचरित्र' तुलसीचे स्वतःचे आहे. रामायणाचा शेवट होता होता भरताने विचारले ... जीवनभर भरताने रामाची सेवाच केली. परंतु प्रश्न विचारला नव्हता. हे हनुमानास कळले. त्याने रामास सांगितले. रामास आश्चर्य वाटले.

तुलसी रामायणात 'वर्णन' कमी ध्यान अधिक असते. हे समजण्यास कठीण असले तरी विविध छटा असतात. अहंकार सोडून लिहितात. भाषेत सहजता, सरलता आहे. 'जागबालिक... जोडाक्षरे टाळून... नम्रता आहे. आशरम/आश्रम नव्हे. मातेने बालकास उचलून घ्यावे तसे. (तुरुंगात असता चोर 'राम' शब्द लिहायला शिकला - विनोबा)

**भारताला तारले :**

जगात आध्यात्मिक साहित्य हवे. नाही तर समाजाचा आधारच तुटेल. तुलसीदासांनी - संतांनी - तो दिला म्हणूनच भारत वाचला. नास्तिकतेच्या प्रवाहापासून त्याला वाचवायला हवा. या हल्ल्यापासून वाचवायला राजा-सैन्य उपयोगी-पुरेपडत नाही. रामायणाने वाचवले. त्याकाळी 'अल्ला' एक, बाकी देवतांची निंदा चालू होती. तुलसीदासांनी 'अल्ला'च्या जागी 'राम' उभा केला. त्यात देवतांची निंदा व नीतीविषयी सांगून भारत वाचवला. ५० राजांना जमणार नाही ते तुलसीदासांनी केले. तुलसी रामायणामुळे लोकसंग्रह झाला, कार्य झाले. राजामुळे नव्हे.

बंगालात ग्रंथ खूप आहेत. परंतु तुलसी रामायणासारखे नाहीत. सामान्यापासून असामान्यांपर्यंत उपयोगी - 'श्रद्धेय ग्रंथ' म्हणून बंगालात भिन्न संप्रदायाचे हल्ले, तसे उत्तर प्रदेशात नाहीत. कारण तुलसी रामायण त्याने लोकांची बुद्धी एकाग्र केली. बुद्धिभेदापासून वाचवले. श्रेष्ठ कार्य केले.

भारतास जोडणारा तो दुवा म्हणावा. कठीण काळात संतांनी आधार दिला. तुलसीदासांनी जोडला.

अन्यथा परिस्थितीच्या कचाट्यात सापटून तो छिन्न भिन्न झाला असता.

तुलसी रामायणात 'सीता त्याग' तुलसीने घेतलेला नाही. पूर्ण रामायणात उन्नत दृष्टी आहे. स्त्री संदर्भातील उद्‌गार भावनेपोटीचे म्हणून सोडून द्यावेत. कारण तुलसीदासांचे हृदय 'सीताचारित्रात' आहे, त्यागात नव्हे.

श्रीरामचरित्रात राम मर्यादा पुरुषोत्तम आहे. त्यावर नैतिक मर्यादा आहे. निर्दोष – भक्ती मर्यादा आहे. बालकाहातीसुद्धा द्यावे असे आहे.

रामभक्ती व कृष्णभक्ती यांत अंतर आहे, हे लक्षात घ्यावे शिवाय तुलसीदासांची स्वतःची काही भूमिका – मत – आहे. 'रामचरित लिख राहा हू' ही भावना आहे.

रामायणात शृंगार आहे पण मार्यादित. वीर, हास्य, इ. रस मानवासाठी हवेत परंतु तुलसीदासांनी त्यास 'भक्तिपरायण' ग्रंथ केला. नीरस नाही केला.

शंकराचार्यांचा ग्रंथ शुष्क आहे. आई–बाप–मुले एकत्र रामायण वाचू शकतात. ऐकू शकतात. म्हणून रसयुक्त. तुलसीने ते केले.

तुलसी रामायण हिंदी लोकांचा धर्मग्रंथ आहे. तुलसीदास म्हणजे रामाचे दूत. राष्ट्रीय दृष्टीने पाहता ग्रंथास स्वतंत्र स्थान आहे. म्हणून सर्वोत्तम अद्वितीय ग्रंथ म्हणावा. केवळ हिंदी भाषिकांचाच नव्हे तर सकल भारतीयांचाच अधिकार आहे.

तुलसीदास सांगतात, 'रामायणात अनेक दोष असीतल परंतु गुण मात्र एकच आहे, तो म्हणजे 'रामनाम' म्हणून त्यास शिरोधार्य मानावे.'

**तुलसी रामायणाची विशेषता :**

वाल्मिकी रामायण व तुलसी रामायण यांतील फरक?

वाल्मिकी रामायणात वर्णने विस्ताराने दिली आहेत. मात्र, तुलसी रामायणात ती संक्षिप्त आहेत.

सीताराम शक्यतो एकत्र हवेत म्हणून तुलसीदासांना वियोग सहन होत नाही. रामसीता विवाह वर्णन विस्ताराने आहेत. मात्र, 'बालकांड' – संक्षिप्त आहे.

तुलसीदासांनी वाल्मिकी रामायणाचा अनुवाद केला नाही. त्यांनी 'संशोधन' केले. अंतःचक्षू उघडून केले. म्हणून तर उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत झाला.

**एकदा विनोबा बिहारात पदयात्रेस गेले असता आलेला अनुभव :**

तुलसी रामायणाशिवाय स्त्री – पुरुष – अन्य ग्रंथ वाचन करीत नसत. ४०० वर्षांनंतरही हीच ताकद. विनोबांनी विचारले, 'रामाला पुत्र कीती?' 'दोनच!' हे नजरेस आणून देताच जमलेल्या स्त्रिया (सुशिक्षितही) हसल्या. परंतु त्यांच्या लक्षात येताच डोळ्यात आसवे आली. तुलसी रामायणावर एवढी निष्ठा असूनही आजवर कुणी कसे समजावले नाही?' आजही उत्तर प्रदेशात व बिहारात 'दोनाची'च धर्म भावना आहे. ती तुलसीदासां–मुळेच! तुलसी रामायणात विवेक विचार विरुद्ध भक्ती विचार आहे. विनोबा म्हणजे बुद्धीचा गुण. बुद्धी असेल तर पराक्रम व पराक्रम असेल तर मोहापासून वाचवते.

भक्ती विचारांत संबंध येतो हृदयाशी. भक्ती असेल तर मोह स्पर्श करू शकत नाही.

मोहासमोर बुद्धी टिकत नाही हे खरे. म्हणून संत हृदयाचाच महिमा गातात. भक्तीचाच महिमा गातात.

**कालियुग वर्णन :**

तुलसी रामायणात कलियुग वर्णन आहे. निंदा आहे. तशीच स्तुतीही आहे. पूर्वी खूप प्रकारे तपस्या करावी लागे. (परमेश्वरप्राप्तीसाठी) परंतु कलियुगात ही

जे कर्म करीत असता आणि जे कर्म केल्यानंतर मनुष्याला जनाची आणि मनाची लाज वाटते, ते वाईट असे समजावे.

गोष्ट सोपी वाटते. जरूरी थोडी आहे. तुलसी दास सांगतात, १) भगवंतांचे गुणगान करणे, २) दान धर्म करून कल्याण साधणे.

तुलसीदास - 'कलौ दानं च नाम च'।

सुंदर कांडात सर्व सीतेविषयीच वर्णिले आहेत. रावणाच्या बंदीत सुद्धा सीतेचे 'वैराग्य रूप' हनुमान पहातो. त्याचे वर्णनही सुंदर आहे. 'सुंदरे सुंदरी कथा' 'हनुमान कथा' सुंदर आहे. कारण त्यात पराक्रम आहे. 'सुंदरे सुंदरी राम:' - रामाचे रूप सुंदर - वर्णन आहे. वनवासी राम रूप सुंदर आहे. कारण 'तपस्वी राम' सुंदर आहे.

**श्रमगौरव :**

शबरीच्या आश्रमात प्रभु रामचंद्र आले तेव्हाचे वर्णन. कधीही न सुकणारी सुगंधी फुले उमललेली पाहून रामाने विचारले, तेव्हा शबरी सांगते, 'मतंग ऋषी फुले घेऊन जंगलात गेले. तेथे लाकडे गोळ करून येतांना जातांना कष्टामुळे त्यांच्या मुखावरचा धर्म बिंदू ओघळले त्याची दुसऱ्या दिवशी फुले झाली. ती ही!

श्रमाची महत्ता, भव्यत्ता आणि सहृदयता यात भरलेली आहे. असे हे वर्णन विश्वसाहित्यात सुद्धा नसेल. जणू भूमातेने करूणेने मुलांचे घामेजलेले चेहरे पाहायला डोळे उघडले होते.

**आक्षेप :**

१) इंग्रज इतिहासकारांनी नेहमीच आक्षेप केले.

२) देव व राक्षस युद्ध इतिहासात नाही.

रावण-रजोगुण, कुंभकर्ण-तमोगुण, निमिषण-सत्वगुण 'रामायण' ही धार्मिक कथा आहे. भक्ति-मार्गाच्या अनुभूतीसाठी आम्ही ती ऐकतो, वाचतो.

३) दक्षिणेत 'कंबनचे रामायण' तामिळमधील ऐकून सिद्ध होते की उत्तर दक्षिण युद्धाची ती प्रचिती नसून परमात्मा विभूतिचेच प्रत्यंतर आहे.

४) 'एळुत्तच्छन्' की रामायण - मलयालम्मधील सर्वोत्तम कृती असून उत्तरभारत दक्षिण भारताचे आक्रमण नव्हे.

चित्त शुद्धीसाठी हा सर्वोत्तम ग्रंथ आहे. रामायण धर्मग्रंथ आहे म्हणून रोज वाचला जातो. रामायण इतिहास नव्हे. त्यातील कथा वेगवेगळ्या वर्णिल्या आहेत. वेगवेगळ्या लेखकांनी - कवींनी. इतिहासात तसे वेगवेगळे असूच शकत नाही.

(सौजन्य : विनोबा साहित्य)

संकलन - **सौ. सुनीता गणपुले**
बी २ / १०४, विकास कॉम्प्लेक्स,
एल. बी. शास्त्री मार्ग,
ठाणे - ४०० ६०१

●●●


## आवाहन

**दिशातील लेख आवडल्याचे सर्वच भेटीत सांगतात. पण या लेखांबद्दलच्या प्रतिक्रिया आपण पत्र लिहून कळवल्या तर बरे होईल. या बरोबरच आपल्या अपेक्षाही कळवाव्यात. 'दिशा' अधिक दर्जेदार करण्यासाठी अशा पत्रांचा आम्हांला उपयोग होईल.**

**- संपादक**

# व्यक्तिविशेष : श्री. रामचंद्र सदाशिव ठाकूर

*'सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतील महत्त्वाचे योगदान असणाऱ्या श्री. रामचंद्र ठाकूर या ज्येष्ठ केळवेकरांचा हा त्रोटक परिचय – संपादक*



ठाणे जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळीचे अध्वर्यु केळवे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व केळवे गावातल्या जवळजवळ सर्वच सामाजिक संस्थांतून आजवर काम केलेले, गावाच्या अनेक सामाजिक चळवळीत हिराहिरीने भाग घेवून मौलिक योगदान दिलेले व्यक्तिमत्त्व रामचंद्र सदाशिव ठाकूर तथा अण्णा रामचंद्र ठाकूर यांचा जन्म केळवे येथे २३ सप्टेंबर १९१४ रोजी एका मध्यमवर्गीय कुटुबांत झाला. केळवे गावात प्राथमिक शाळेची सोय असल्याने अण्णांचे प्राथमिक शिक्षण तेथेच पूर्ण झाले. आणि त्यावेळेच्या परिस्थितीनुसार त्यांना प्राथमिक शिक्षकाची नोकरी मिळाली पण काही वर्षानंतर त्यांना ट्रेनिंग कॉलेजचे शिक्षण घेण्याची रत्नागिरी येथे जाण्याचा आदेश मिळाला. त्यावेळी शेती व्यवसाय करण्याचा निर्णय घेऊन त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला शेतीत नारळ, पोफळी व पानवेलीचे उत्पादन करीत असताना गावातील विविध संस्थांत सक्रिय कार्य करू लागले. सन १९५५ साली स्थापन झालेल्या ज्ञाती संघाच्या कार्यात सुरुवातीपासून भाग घेतला. सन १९५९ साली शेतकरी–बागायतदारांची सहकारी संस्थेची स्थापना करण्यात आली. त्यामध्येदेखील अण्णांचा मोलाचा सहभाग होता. सन १९६२ साली केळवे गावात 'नूतन विद्या विकास मंडळ' या माध्यमिक शिक्षण संस्थेची स्थापना होऊन या संस्थेमार्फत आदर्श विद्यामंदिर ही शाळा सुरु करण्यात आली. या नूतन विद्याविकास मंडळातही ठाकूर अण्णा सदस्य व विस्वस्त म्हणून कार्यरत होते. १९६२ ते १९६७ पर्यंत उपसरपंच व १९६७ ते १९७२ पर्यंत केळवे ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून त्यांनी कार्य केले. सन १९६० च्या सुमारास केळवे येथे पोस्ट खात्याचे केवळ एक ब्रँच कार्यालय होते. दोन तीन वर्षे सरकार दरबारी पाठपुरावा करून केळवे येथे सब–पोस्ट व तार कार्यालय मिळवून घेतले.

अण्णांच्या कारकिर्दीतील आवर्जून उल्लेख केला जावा असे महत्त्वाचे कार्य म्हणजे 'भारत वाचनालय', केळवे ही संस्था. खेडेगावात वाचनालय उघडणे आणि त्याहूनही ते यशस्वीरीत्या चालविणे हे अतिशय अवघड व जिकरीची गोष्ट असून कार्यकर्त्यांच्या चिकाटीची परीक्षा घेणारे हे काम होते. सन १९५१ साली स्थापन झालेल्या या वाचनालयाचे अण्णा तीस वर्षाहून अधिक काळ अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय कारकिर्दीत स्वतः कामाला वाहून घेऊन अण्णांनी वाचनालयाची शान वाढविण्याचा सतत प्रयत्न केला. केळवे गावाच्या त्यावेळीच्या पाच सहा हजार लोकवस्तीच्या लहानशा गावातल्या वाचनालयाला नगर वाचनालयाचा दर्जा प्राप्त करून घेण्याची किमया अण्णांनी करून दाखविली. सामाज कार्याप्रमाणे धार्मिक कार्याचीही अण्णांना आवड आहे. केळव्याच्या ठाकूरजी देवस्थान मंडळाचे ते विश्वस्त होते. केळव्यातील ग्राम सुधारणा मंडळ, नूतन नाट्य मंडळ या संस्थातूनही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. सन १९९८ मध्ये आई–वडिलांचे स्मरणार्थ त्यांनी

(पान क्र. २२ वर)

# 'वांद्रे वरळी सागरी सेतू' : एक अभियांत्रिकी आश्चर्य

*'इंजिनिअरिंग मार्व्हल' असा याचा उल्लेख केला आहे. त्या वांद्रे वरळी सागरी सेतू हा परिचय - संपादक*

सुप्रसिद्ध अमेरिकन जर्नल 'बिझनेस वीक' ने जगातल्या एकूण दहा अशा गणल्या गेलेल्या भव्य अभियांत्रिकी आश्चर्यांमध्ये (इंजिनिअररिंग मार्व्हस्) या 'वांद्रे वरळी सागरी सेतू' ची गणना केली आहे, हा 'भारतीय अभियांत्रिकी' च्या शिरपेचातला एक अभिमानास्पद तुराच आहे. हा 'सागरी सेतू' भर समुद्रात कसा बांधला गेला सर्वसामान्य जनतेच्या मनात खूपच कुतूहल आहे. मुंबईची नवी ओळख म्हणून सगळीकडे गणल्या गेलेल्या या भव्य आणि दिमाखदार सागरी सेतू ची काही मनोरंजक आणि उद्‌बोधक वैशिष्ट्ये जाणून घेऊ या.

**तपशील :**

या सेतूला सर्वसाधारणपणे १५ मीटर परिघाचे एकूण २३० स्तंभ असून दर दोन स्तंभांमधलं अंतर सर्व साधारपणे ५० मीटर आहे.



सेतूच्या दोन्ही बाजूचे सुमारे दीड किमी. लांबीचे पोचरस्ते सोडता समुद्रातील प्रत्यक्ष सेतूची लांबी सुमारे चार किमी आहे. वास्तविक हा एकच पूल नसून एकमेकाच्या शेजारून एकमेकांना समांतर जाणारे परंतु एकमेकापासून विलग असे प्रत्येकी चार पदरी दोन पूल आहेत. आणीबाणीच्या प्रसंगी या पुलावरून त्या पुलावर जाण्यायेण्यासाठी दोघांना जोडणारे तीन जोडरस्ते आहेत. असा हा आठपदरी 'सागरी सेतू' अशा प्रकारच्या सेतूंमधला भारतातला पहिलाच 'सागरी सेतू' आहे.

या सेतूसाठी सर्वसाधारणपणे अत्युत्तम दर्जाचे सुमारे वीस लाख गोणी सीमेण्ट आणि चाळीस हजार मेट्रिक टन्स स्टील वापरण्यात आले आहे.


**पुलामुळे होणारे फायदे :**

पूर्वी रस्त्यावरून प्रवास करताना लागणारे २३ वाहतूक सिग्नल या सागरी सेतू मुळे टळल्यामुळे पूर्वीपेक्षा प्रवासाचा निदान एक ते दीड तास तरी वेळ वाचतो. हा सर्व प्रवास वायू आणि ध्वनिप्रदूषण मुक्त तर आहेच पण त्यामुळे वेळ आणि इंधनाचीही प्रचंड प्रमाणात बचत होते. दिवसा पूर्वेला मुंबई नगरीची आकाशरेषा आणि पश्चिमेला अथांग अरबी समुद्राचे दर्शन घडविणाऱ्या या सेतूवरचा प्रवास सुखकारक आणि आल्हाददायकही आहे.

एका पुलावरून वांद्रे ते वरळी अशी मुंबईच्या दक्षिण दिशेकडे आणि बाजूच्या पुलावरून ते वांद्रे अशी वाहतूक मुंबईच्या उत्तर दिशेकडे रात्रंदिवस अविरतपणे सुरू असते.

**सेतू उभारणीची अभियांत्रिकी प्रक्रिया :**

जमिनीवरच्या कारखान्यात उत्पादित केलेले अत्युत्कृष्ट गुणवत्तेच्या सीमेण्टचे प्रचंड आकाराचे २,३६० ब्लॉक्स एकाला दुसरा चिकटवून आणि आधुनिक इंजिनिअरींग तंत्राने जाडून पुलाचा रस्ता तयार केलेला असतो. विविध आकाराच्या या ब्लॉक्सचे (ज्याला इंजिनिअरिंगच्या तांत्रिक परिभाषेत 'सेगमेन्टस्' म्हणतात) सर्वसाधारण वजन सुमारे एक ते दीड लाख किलो पर्यंत असते. असा हा एकेक भीमकाय सेगमेण्ट विहिरीत पडलेला लाकडाचा प्रचंड ओंडका जसा दोरखंडाने वर खेचून घ्यावा अशा पद्धतीने एका राक्षसी यंत्राने वर ओढून घेऊन तो आधीच्या 'सेगमेण्ट'ला एका अत्यंत शक्तिशाली चिकट रसायनाने चिकटवून मग आतल्या बाजूने यांत्रिक पद्धतीने जोडला जातो. अशा प्रक्रियेने एका तुकड्याला दुसरा तुकडा जोडून स्तंभांवरचा पुलाचा रस्ता तयार होत जातो.



ही भीमकाय सेगमेण्टस् उचलणारे १,२६० मेट्रिक टन वजनाचे राक्षसी यंत्र ('लॉचिंग ट्रस') उचलून भर समुद्रात विशिष्ट स्तंभावर नेऊन ठेवण्यासाठी सिंगापूरहून 'हर्क्युलस' नावांची एक तरंगती क्रेन मागवावी लागली, जिच्या ताकदीची केवळ कल्पनाच केलेली बरी. या क्रेनमुळे केवळ अतिशय अल्प कालावधीत कुशलतेने पुरे झालेले हे काम एरवी पुरे व्हायला सहा महिन्यांहून अधिक काळ लागला असता आणि म्हणूनच केवळ ही क्रेन भारताच्या खंडप्राय भूमीला उजवी प्रदक्षिणा घालून अरबी समुद्रमार्गे सिंगापूरपासून मुंबईला आणावी लागली.

या पुलाचा सुमारे ५०० मीटर चा भाग मधोमध सुमारे ४५ मजली इमारती एवढ्या उंचीच्या एकाच स्तंभाच्या दोन्ही बाजूंना ताणलेल्या अशा धातूंच्या शक्तिशाली केबलसनी उचलून आणि तोलून धरलेला आहे, ज्याला इंजिनिअरिंगच्या तांत्रिक परिभाषेत 'केबल स्टेड ब्रिज' असे संबोधले जाते.

**मनोरंजक वैशिष्ट्ये :**

एक अतिशय मनोरंजक माहिती, म्हणजे या सुमारे चार इंच व्यासाच्या या अतिशय ताकदवान् केबल्स निरनिराळ्या जाडीच्या लाखो अंतर्गत सूक्ष्मातिसूक्ष्म केबल्सपासून जाणारा सुमारे ४०,००० किलोमीटर्स लांबीचा कंबरपट्टा तयार होऊ शकेल असे सांगितले जाते.

या पुलाचे वजन अशा सुमारे पन्नास हजार अफ्रिकन हत्तींएवढे होऊ शकेल असे गणित आहे. (एका आफ्रिकन हत्तीचे वजन सुमारे पाच हजार किलो असते.)

रात्रंदिवस भणाणणाऱ्या भन्नाट वाऱ्यावादळात, उन्हापावसात भर समुद्रात भरती-आहोटी सुरू असताना, या सेतूचे हे सर्व बांधकाम अनेक वर्ष अहोरात्र अविरतपणे करणाऱ्या अभियंत्यांच्या, तंत्रज्ञांच्या आणि हजारो कामगारांच्या अपरंपार कष्टाची आणि मेहनतीची आपण कल्पनाही करू शकणार नाही.

आता जेव्हा संधी मिळेल तेव्हा जमल्यास सेतूची एकदा तरी सफर करून याच आणि दादर-माहीमच्या बाजूने रात्रीच्या वेळी रोषणाईने झगमगणाऱ्या आणि चमचमणाऱ्या मुंबापुरीच्या अलंकाराचे नितांतसुंदर दर्शन तरी घ्याच पण अर्थातच सर्व वाहतुकीचे, पथकराचे (टोलचे) आणि सुरक्षिततेचे सर्व नियम कटाक्षाने

पाळूनच. आणखी एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे ती म्हणजे या पुलावरून प्रवास करायला दुचाकी आणि तिचाकी वाहनांना मात्र परवानगी नाही.

**श्री. सुभाष जोशी**
कळवा, ठाणे
sugojoshi@rediffmail.com
Mob.: 9892138220

●●●

कॉर्पस ख्राइस्ट कॉलेज, केंब्रिज विद्यापीठ ग्रंथालय व स्टॅनफोर्ड विद्यापीठ यांच्या संयुक्त प्रयत्नांतून चार वर्षे राबवण्यात आलेल्या डिजिटायझेशन प्रकल्पानंतर ५५० अँग्लो सॅक्सन हस्तलिखिते, जी कॉर्पस ख्राइस्ट पार्कर ग्रंथालयात आहेत, ती महाजालावर उपलब्ध करून देण्याचे काम पूर्ण झाले आहे. या संग्रहामध्ये अँग्लो सॅक्सन क्रॅानिकल, सहाव्या शतकातील सेंट ऑगस्टाइन यांची प्रवचने, नवव्या शतकाच्या पूर्वार्धात लिहिलेली कॉर्पस ग्लॉसरी या महत्त्वाच्या हस्तलिखितांचा समवेश आहे. यासाठी इच्छुकांनी महाजालावरील www.hisrotytoday.com/news-pavherlihrary या संकेतस्थळाला अवश्य भेट द्यावी.

(पान क्र. १९ वरून)

**व्यक्तिविशेष : श्री रामचंद्र सदाशिव ठाकूर**

कुलस्वामिनी कालिका देवीच्या मंदिराच्या प्रागणांत धार्मिक सप्तस्वरूप दीपमाळ बाधून दिली आहे. तसेच सन २००२ पासून त्यांनी ठाणे जिल्ह्यातील शासनमान्य ग्रंथालयातील ग्रंथपालास दरवर्षी श्री ठाकूर गुरूजी (केळवे) ''आदर्श ग्रंथपाल पुरस्कार'' (एक हजार रुपये रोख व शाल-श्रीफळ) देण्यासाठी ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाकडे भरीव देणगी दिली आहे. त्यांचे तिन्ही चिरंजीव-अशोक, जयप्रकाश व सुधाकर हे द्विपदवीधर असून सामाजिक कामात अग्रेसर आहेत. सामाजिक मूल्यांचे अवमूल्यन होत असताना निरपेक्ष, सेवावृत्तीने काम करणाऱ्यापैकी अण्णा एक आहेत. निर्मोही व अबोल वृत्तीचे काम करमारे समाजसेवक आहे. आज अण्णा ९५ वर्षाचे आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात डोळे दिपविणाऱ्या बिजलीचा झगमगाट नसेलही, पण सामान्यांना आश्वासक वाटणाऱ्या नंदादीपाचा स्निग्ध व स्नेहल प्रकाश मात्र जरूर आहे. समाजसेवेचा अण्णांच्या रूपाने उभा असलेला नंदादीप सतत तेवत आहे.

**श्री. पी. एम्. पाटील**
वार्ताहर, दै. मुंबई सकाळ

●●●

दिशा
नियमित
वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*या लेख मालेतील पुढील लेख- संपादक*

**संस्कृती ही संकल्पना कोणती? :**

भारतीय संस्कृती ही संकल्पना काय आहे? जगातील इतर संस्कृत्या व भारतीय संस्कृतीत काय फरक आहे? हे फरक केवळ वेगळेपणाचे एखादे लक्षण मानावयाचे की 'भारतीय संस्कृती' ही इतरांपेक्षा अत्यंत अलग व अत्यंत उच्च व श्रेष्ठ स्तरावरची संकल्पना आहे? या प्रश्नांची उत्तरे आपण शोधणार आहोत.

**बहु सांस्कृतिकता व श्रेष्ठ संस्कृती :**

आजकाल संस्कृतींची भिन्न भिन्न स्वरूपे, त्यांचे गुणगान गाणारे बरेच लेख वाचण्यात आले. एवढेच नव्हे तर, कुठल्याही संस्कृतीच्या 'दर्शनी' स्वरूपाच्या मुळाशी जाऊन अभ्यास न करताच काही साहित्यिक, राजकारणी व विद्वान एका आधुनिक उथळ किंवा उदार मत धारणेत 'बहु सांस्कृतिकतेचा' (Multi culturatism) उद्घोष करताना दिसतात, तेव्हा हसावे का रडावे हे समजत नाही! कारण, माझ्या अभ्यासात मला जी भारतीय संस्कृतीची 'बीज रचना' व 'संकल्पना' दिसली, ती पाहिल्यावर अशा उथळ अभ्यासकांची कीव करावीशी वाटली.

**भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व :**

काय आहे विशेष या भारतीय संस्कृतीच्या बीज स्वरूपातील संकल्पनेत? याच्या उत्तरासाठी एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात ठेवायला हवी. विश्वाच्या दृश्य, अदृश्य, व्यक्त, अव्यक्त व चेतन, अचेतन गूढ व अगम्य गोष्टींचा 'आवाका', जर असेल तरच आणि तरच..., ह्या पृथ्वीवर अनेक युगे अस्तित्वात असलेल्या हिंदू वेदिक संस्कृतीची थोरवी समजू शकेल!

**संस्कृतीचे बीज :**

मुख्य म्हणजे या संस्कृतीचे बीज वेद ज्ञानात म्हणजेच 'वैश्विक सत्य ज्ञानात' सामावलेले आहे. त्यालाच आध्यात्मिक परिभाषेत 'ब्रह्मज्ञान' म्हटले जाते व ते सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे!

हे वाक्य एका अभिनिवेशी वृत्तीतून उगवले आहे असे वाटून, त्यावर, विचार केला न जाण्याची शक्यता जास्त आहे. पण आपले पूर्वग्रह बाजूला ठेवून हे विधान एक पूर्वाश्रमीचा मार्क्सिस्ट, सिव्हील इंजिनीअर व कुंडलिनी साधक करतो आहे, याला योग्य न्याय द्या!

**मानवी जीवनाची (जीवात्मा) ध्येय आकांक्षा :**

पण, जर भारतीय वेदिक संस्कृतीतील एक बीजात्मक ध्येयवाक्य मनात घोळवले व खोल विचार केला तर माझ्या पुढील लिखाणाचा बोध होईल.

**''असतो मा सद्गमय।**

**तमसो मा ज्योर्तिर्गमय।**

**मृत्योर्मा अमृतम् गमय।''**

(बृहद अरण्यक उपनिषद [I. 3.28])

याचे भाषांतर महायोगी अरविंद घोष यांनी केले आहे. ते मुद्दाम इंग्रजीतूनच उद्धृत करतो.

**"From the non being to true being.**

**From the darkness to the Light,**

**From death to Immortahty"**

हे ध्येय वाक्य उराशी बाळगणाऱ्या संस्कृतीची उंची काय असेल? कोणत्या कालखंडात हे उद्गीथ गायले

गेले? मानवाच्या अव्यक्त प्रेरणा (Aspirations) यांची जाण कोणत्या समाजाने घेतली, संभाळली, जतन केली वर्धिष्णु केली व त्याला पोषक समाज धारणा व संस्कार बाळगले!!

हे ध्येयवाक्य ज्या काळात ऋषीने गर्जले, तो काळ डोळ्यासमोर आणा. ''<u>**आहार, निद्रा, भय, मैथून**</u>'' ह्या शारिरीक क्रिया सुद्धा जेव्हा माणसाला पूर्ण अर्थाने ज्ञात झाल्या असाव्यात किंवा नाही याची कल्पना नाही अशा काळात त्या समाजाला स्वत:च्या प्राणी जीवनांतील आयुष्यात आपल्या पृथ्वीवरील गूढ व अगम्य अस्तित्वाची खरी ओळख होणे किंवा करून देणे ही केव्हढी मोठी घटना असली पाहिजे!! मानवी देहाच्या अस्तित्वालाच पूर्ण सत्य मानणाऱ्या आजच्या अत्यंत सुमार व अनैतिक भोगवादी व प्राणी स्तरावरील इहवादी संस्कृतीच्या, कित्येक शतके किंवा युगे मागे, म्हणजे पूर्वी असलेल्या समाजाला सत्य, असत्य, अज्ञान अंध:कार व पूर्ण प्रकाशमय ज्ञान आणि मृत्यू आणि अमरत्व, या कल्पनांची जाणीव होऊन, त्या अर्धवट जीवनाला एका ध्येय धोरणाची दिशा दाखवून स्वीकाराला लावली, अशा सांस्कृतिक, दर्शनाला कोणती गुणवत्ता व श्रेणी द्यावी असे वाटते?

**भौतिक उत्क्रांती कशाची? देह की आत्मा? :**

<u>**डार्विनच्या भौतिक देहिक 'उत्क्रांतिवाद'**</u> हा अगदी अलीकडे मांडला गेला. त्यातील प्राणीमात्रांच्या शरीरात कालक्रमणेत व जन्मजन्मांतरात ह्या पृथ्वीवर बदल होत गेला व तो बदल एका प्रगतीपर सूत्रावर आधारलेला दिसला हा तो मोठा वैज्ञानिक शोध होय असे मानले जाते!!

पण, वरील वेद, उपनिषद वाक्यात या प्रगतीची गुण वैशिष्ट्ये कोणती जाणली गेलेली दिसताहेत? केवळ मर्त्य देहा संबधीची नव्हेत, तर या शरीर बद्ध अस्तित्वातील, जे अनंततत्व 'जीवात्मा' या स्वरूपात आहे त्याच्या जाणीवेबद्दल वा ज्ञानाबद्दलच्या संदर्भातले हेतू व उद्देश सांगितले आहेत. ते गुणात्मक व सात्विक प्रवृत्ति व रंगांचे आहेत, हे लक्षात घ्या!!

हा देहबद्ध जीव हा एक चिरंतन तत्वाचा 'जीवात्मा' व त्याला सामावणारा देह (शरीर) हे एक नाशिवंत व सीमीत जैविक आयुष्य असलेले 'प्रकृति रचना यंत्र' ही जाणीव प्राणी जीवनातील चैतन्याला होणे ही दुरापास्त व अत्यंत अवघड अशी गोष्ट आहे. देव, 'गॉड', अल्ला ह्या संकल्पना त्या तुलनेने सामान्य आहेत.

पण या मर्त्य देहात जीवन व्यतीत करीत असताना आपल्यातील अमरत्वाची जाणीव होणे व त्या तत्वापाशी आपले अस्तित्व बांधणे – संलग्न करणे, ही सामान्य गोष्ट वा प्रयत्न नव्हे. पण, भारतीय संस्कृतीत ह्या प्रयत्नांचा शोध व त्यानंतर त्या यंत्रणेचा, संस्काराचा पूर्ण विस्तार व संभाळ, 'योग' ह्या शास्त्राने केला आहे. या 'योग क्रियेचा' मूर्ख व निरर्गत्म 'निषेध' युरोपियन धर्म, संस्कृत्या व विज्ञान करीत आहे तेव्हा या विधानाना, विचारांना कोणती सांस्कृतिक उंची प्रदान करावयाची?

त्यानंतर, या वरील मानवी चैतन्याच्या ध्येय साधनेसाठी व पूर्तीसाठी जे विचार झाले त्याला या पृथ्वीवर जोड नाही तोड नाही.

या पृथ्वीवरील अस्तित्वाच्या कोड्याचा उलगडा करण्यासाठी व हे जीवन व ही प्रयोग करण्याची संधी सार्थ करण्यासाठी सारे जीवन व सामाजिक जीवन समर्पण करून बांधून टाकणारी ही 'व्यष्टि – समष्टि', 'हिंदू-आर्य' समाजाची संस्कृती बनली. सगळ्या मानवजातीने कौतुक करावे अशी ही वैश्विक घटना आहे. आजही ती जिवंत आहे व धगधगत व प्रयत्नशील आहे.

**पृथ्वीवरील उत्क्रांतीचे स्वरूप व मार्ग :**

आता हे प्रयत्न ज्या विश्वाच्या पर्यावरणांत होताहेत त्याची जाणीव करून घेऊ या!!

या जीवात्म्याचा जन्म एखाद्या मानवी देहांच्या मैथूनी कृत्याने गर्भात होऊन स्त्री देहाच्यामार्फत या पृथ्वीवर त्याचा प्रवेश होतो. या घटनेला पृथ्वीवरील प्रकृती, चैतन्य, विश्वांतील ग्रह, तारे या सगळ्यांची मदत होते. खरे तर हा देखील त्यांच्याच प्रयत्नाचा एक भाग असतो!! अशाच प्रकारांने, जवळ जवळ सर्व वनस्पती, पक्षी, प्राणी जीवन, या पृथ्वीवर 'एक जीवन सातत्य' संभाळत असते. बीजातून वृद्धी व नंतर त्याला नूतन बीज प्राप्ती हा क्रम नैसर्गिकरित्या अव्याहत पणे चालू आहे.

**Evolution of Consciousness :**

पण, त्यापुढचा शोध महत्वाचा आहे. इथेच हिंदू वेदिक ज्ञान हे पाश्चात्य संस्कृतीवर मात करते. या जीवात्म्याच्या अस्तित्वाशी जेव्हा मानव आपली वैयक्तिक Identity व्यक्तित्व जोडून देतो तेव्हा त्याला एका आंतरिक दृश्यामध्ये (चित्रपटामध्ये) सामील व्हावे लागते. ते म्हणजे ह्या '**आत्म्याचा उद्धार**' (Evolution). हे या मानवी अस्तित्वाचे खरे सार्थक आहे. भगवद्‌गीतेत ते ''**उद्धरेत उद्धरेदात्मनाऽत्मानं्**'' या वचनांतून सांगितले आहे.

**उद्धरेदात्मनाऽत्मानं नात्मानवसादयेत्।**

**आत्मैव ह्यात्मना बंधुरात्मैव रिपुरात्मना।।६।।५।।**

**(भ. गीता)**

(It is the soul, consciousness, which is in the crucible of Evolution)

**संस्कृतीतील मूलभूत फरक व उणीवा :**

पण, हे पुष्कळ अंशाने सर्वमान्य झाले आहे. पण पाश्चात्य संस्कृती व भारतीय सद्यस्थितीतील जाणीवा यावर थोडे भाष्य आवश्यक आहे.

पाश्चात्य संस्कृतीत State & Religion म्हणजे राज्यसंस्था व धर्म हे वेगवेगळे केले आहेत. राज्यसंस्था ही इहवादी, निधर्मी, भोगवादी व प्रसंगी अनैतिक किंवा हुकुमशाही पण असते व त्याचे समर्थन करते. तर 'धर्म' म्हणजे Religion [spirituality नव्हे] एक मानसिक श्रद्धेचा व आचरणाचा प्रकार मानला जातो. त्यातील नैतिकता ही काही अंशी सामाजिक आचार विचारांतील समन्वयी असते, पण मानसिक स्तरापुढे वरील पातळीवर आत्मिक स्तरापर्यंत जात नाही. त्यामुळे धार्मिक नैतिकता इतर संस्कृतीवर आक्रमण, द्वेष व रक्तरंजित युद्धे करण्यातही धन्यता मानते व त्याचे समर्थन करते.

**''सिमिटिक रिलीजन'' :**

सगळे Semitic धर्म म्हणजे ख्रिश्चन, ज्यू, इस्लाम या प्रकारात मोडतात!!


नीतिमत्ता ही एक सामाजिक औदार्याचा वा सामंजस्याचा भाग समजला जातो. त्याला जोपर्यंत मानवी आत्म्याच्या संस्काराचा, आत्मिक व शास्त्रीय चिरंतन अविभाज्य योग शास्त्रासारखा, (अष्टांग योग, पातंजल योग) किंवा 'उर्ध्वरेत यज्ञ, अश्वमेध यज्ञ, कुंडलिनी योग वगैरे अशा तंत्रासारख्या रचना वा यंत्रणा नाहीत. तोपर्यंत या नीतिविचाराना स्थायी भाव वा वैज्ञानिक बैठक नाही.

**भारतीय संस्कृतीच्या प्रगतीचा इतिहास :**

याच्या दुसऱ्या बाजूला भारतीय संस्कृतीतील आजचे दर्शन कोणते आहे?

'**ब्रह्मज्ञान**' समजावून सांगणारे सगळे लिखीत स्वरूपांतील ज्ञान आज वैदिक संहिता, उपनिषद, गीता, पुराणे, दर्शने या स्थितीत उपलब्ध आहे. पण, त्याचा एकत्रित व पूर्ण बोध अजिबात नाही, किंवा एखाद्या

शास्त्रापुरता, एखाद्या संप्रदायापुरताच अस्तित्वात आहे. त्यामुळेच महायोगी अरविंद व त्या अगोदर स्वामी दयानंद यांना वेदिक ज्ञानाकडे समाजाचे लक्ष वेधण्यासाठी अतोनात प्रयत्न करावे लागले. आणि, आजही ते ५/१० टक्क्याहून अधिक यशस्वी झालेले नाहीत. ही दुर्दैवाची गोष्ट आहे!!




**असे का झाले? :**

एका काळी ज्या पूर्ण ज्ञानाचा बोध समाजाला झाला होता त्याचे पुरावे भारतीय संस्कृतीच्या इतिहासात सापडतात. पण, त्यांची आज ही दुरावस्था का असावी?

<u>हा एक यक्षप्रश्न आहे ते निर्विवाद !!</u>

यावर मी महायोगी अरविंद यांचे काही भाष्य मुळातच इंग्रजीतले उद्धृत करतो, कारण ते तितकेच महत्वाचे आहे.



**महायोगी अरविंद**

"The terrestrial evolutionary working of Nature from Matter to Mind and beyond it, has a double process: there is an outward visible process of physical evolution with birth as its machinery - for each evolved form of body housing its own evolved power of consciousness is maintained and kept in continuity by heredity; there is, at the same time, an invisible process of soul evolution with rebirth into ascending grades of form and consciousness as its machinery.

The first by itself would mean only a cosmic evolution; for the individual would be a quickly perishing instrument, and the race, a more abiding collective formulation, would be the real step in the progressive manifestation for the cosmic Inhabitant, the universal spirit: rebirth is an indispensable condition for any long duration and evolution of the individual being in the earth existence."

**संकुचित व्यक्तिगत उद्धार :**

या भाष्याचे महत्व कोणते? भारतीय संस्कृतीतील धर्म, तत्वज्ञान व अध्यात्म या विचारांत एक तऱ्हेचा संकुचित व्यक्तिवाद शिरला आहे. स्वत:च्या अस्तित्वाला समष्टिपासून, प्रकृतिपासून, इतर चैतन्यापासून, इतर जंगम वस्तूंपासून, इतर ग्रह, तारे, सूर्य, चंद्र याजपासून वेगळे स्वतंत्र, एकले अस्तित्व आहे व त्याला 'मोक्ष', वैकुंढ वगैरे प्राप्त झाले की पूर्णता झाली असा दृढ पण चुकीचा समज प्रस्तुत आहे.

**व्यष्टि-समष्टि-सृष्टि समीकरण आत्मोद्धारासाठी :**

पण, या जीवात्म्याच्या उगमाला, उद्धाराला, त्याला मिळणाऱ्या शरीराला तर इतरांची आवश्यकता आहेच. पण, एवढेच नव्हे तर त्याचा स्वत:चा उद्धार हाही एक सामाजिक वा वैश्विक उद्धार प्रयोगाचाच एक भाग आहे ही जाणीव हवी आहे व ती रास्त आहे - सत्य आहे.

याला एक साधे उदाहरण द्यावयाचे तर लोकशाही आदर्शात हे सरकार, लोकांचे, लोकांसाठी व लोकांचे अनुशासन करण्यासाठी आहे. हे जसे आपण मानतो, तसा हा आत्मोद्धाराचा 'ब्रह्मप्रयोग' आहे.

त्यामुळे विनोबा भावे म्हणाले होते तसे वैयक्तिक समाधी किंवा मोक्ष हे पूर्णसत्य नव्हे तर सामाजिक समाधि व सामाजिक मोक्ष हीच खरी सत्य संकल्पना होय!!

ज्या बृहद अरण्यकोपनिषदातून आपण वरील मानवजातीचे ध्येयवाक्य घेतले त्या उपनिषदाबद्दल महात्मा नारायणशास्त्री, हे आपल्या 'उपनिषद रहस्यात' लिहीतात :-

''इस उपनिषद् में जगत् के मिथ्या होने के पक्ष में एक शब्द भी नही कहा गया है।'' (Pg.831) यहाँ दृश्यमान जगत् को सत्य कहा है। इस जगत् से मनुष्यों के हृदय और इंन्द्रियाँ उत्पन्न होती है, और वे इन्द्रियॉ सत्य = दृश्य जगत् का उपभोग करती है।

इसका भाव स्पष्ट है कि प्रारंभ में जगत् 'कारण' और अन्त मे 'कारण रूप' को प्राप्त जगत् दोनो सत्य = अविनाशी है, परन्तु 'मध्य' का 'कार्यजगत्' नाशवान है। प्रत्यय होने पर कारण रूप प्रकृति मे परिवर्तित हो जाया करता है।''

त्यामुळे संस्कृतीच्या उगमाला व सतत उद्धाराला जसे एका तऱ्हेचे साक्षात्कारी ज्ञान आवश्यक आहे व ते एखाद्या व्यक्तिमार्फतच होते - तसेच व तितक्याच महत्वाचे त्या संस्कृतीच्या जिवंतपणासाठी व अविकृत बोधजन्य आचरणासाठी समष्टि, समाज, प्रकृति, निसर्ग यांची मदत व पुरस्कार आवश्यक असतो. त्या सातत्यावरच संस्कृती एका पिढीतून पुढच्या पिढीत आणि जीवात्म्याच्या आगमन, निर्गमन वा मानवी देहबद्ध जीवनचैतन्याच्या जन्म मृत्यू पुनर्जन्म या क्रियामध्येही आपली गुणवत्ता टिकवून धरू शकते आणि उद्धारूही शकते!!

**भारताला पृथ्वी, भूमी, पुनर्जन्म, व इश्वरी, नैसर्गिक वरदान :**

इतके सातत्य व सहकार्य भारतीय संस्कृतीला आश्चर्यकारक रीतीने निदान १०,००० वर्षे लाभलेले दिसत असले, तरी, त्याही भारतीय संस्कृतीमध्ये काही अज्ञानयुक्त तामसी कालखंड आला ही सत्य गोष्ट आहे.

ह्या परिस्थितीला 'हिमयुगप्रलय' कारणीभूत आहे काय - याचा विचार पुढल्या लेखात करूया !!

वादविवादासाठी नव्हे पण केवळ या सांस्कृतिक प्रवाहाच्या मुद्द्यावर भाष्य म्हणून वैदिक हिंसायुक्त 'द्रव्य यज्ञ' वगैरे भौतिक पशुबळी, नरबळी यज्ञ संस्कृतीचा एक काळ व त्यावर प्रतिक्रिया म्हणून बुद्ध संस्कृतीचा उदय व अस्त हा कालखंड नजरेत येतो. यावर पूर्ण भाष्य या लेखांत विस्तारभयाने करणार नाही, पण ते करणे आवश्यक आहे व ते पुढच्या काही लेखांत करीन अशी धारणा आहे.

**भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य व श्रेष्ठता :**

सध्याच्या लेखाचा एक सूरी भाव हा आहे की '<u>भारतीय संस्कृतीची श्रेष्ठता</u>' आपल्यालाच नीटपणे माहीत नाही. आज ती तोडक्या मोडक्या अवस्थेत आहे. आणि त्या संस्कृतीचाअजिबात परिचय नसलेले मेकॉले साहेबाच्या व पाश्चात्य इहवादी, भोगवादी संस्कृतीच्या झगमगाटाने दिपलेले काही विद्वन व साहित्यिक जेव्हा बहू सांस्कृतिकवादाचा पुरस्कार करतात तेव्हा खंत वाटते.

पूर्ण अभ्यास आवश्यक :

भारतीय संस्कृतीचा अभ्यास म्हणूनच अत्यावश्यक बनला आहे. त्यात आपले प्रयत्न कामी यावे असे मनोमन वाटते.

।। हरी ॐ।।

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●





# स्वर्ग

*स्वर्ग व नरक या सापेक्ष कल्पना आहे. त्या संबंधीचे हे विचार- संपादक*

स्वर्ग म्हणजे आनंदाचे ठिकाण तर नरक म्हणजे दुःखाचे ठिकाण होय म्हणून मृत्यूनंतर स्वर्गप्राप्ती व्हावी म्हणून प्रत्येकजण आपापल्या परीने सर्वतोपरी प्रयत्न करीत असतो. त्यासाठी जप, तप, पूजा, होम, हवन सर्वकाही करीत असतो. पण मृत्यूनंतर माणूस स्वर्गात गेला की नरकात हे कसे समजायचे? त्यासाठी कोणता मापदंड वापरायचा? हिंदू धर्मामध्ये पुनर्जन्म मानत असल्यामुळे त्या धर्मातील लोक माणसांच्या मृत्यूनंतर तो योनीमध्ये गेला हे पहाण्याची परंपरा आहे. माणसांच्या मृत्यूनंतर तिसऱ्या दिवशी सायंकाळी एका पसरट भांड्यात गुलाल घेऊन तो व्यवस्थित पसरून त्यावर कसलेही ओरखडे न पाडता दुसऱ्या एका भांड्याखाली झाकून ठेवला जातो. त्यावर तेलाचा दिवा लावून वर माळा लावून ठेवल्या जातात. रात्रभर भजन म्हणत जागरण केले जाते. आणि पहाटे त्या गुलालावर कशाचे चित्र उमटले गेले आहे हे पहाण्यात येते. समज असा असतो की, ज्या योनीमध्ये तो गेला असेल त्याचे चित्र / खूण त्या गुलालावर उमटले जाते. उदा. माणसांच्याच योनीत जन्म झाला असेल तर माणसांचा पाय / हात. किंवा पशू - पक्षी यांच्या योनीत जन्म गेला असल्यास त्या पशू- पक्षींचे पाय. इ.

ग्रामीण भागात ही पद्धत अजूनही पहाण्यास मिळते. अशा प्रकारच्या वेगवेगळ्या धर्मामध्ये वेगवेगळ्या प्रथा दिसून येतात. खरे तर अशा प्रथा म्हणजे अंधश्रद्धाच म्हणाव्या लागतील. मृत्यूनंतर माणूस स्वर्गात गेला की नरकात गेला हे पहाण्यासाठी गुलालावर कोणते चित्र उमटले हे पहाण्याची गरज नाही तर त्यासाठी पुढील दोन गोष्टी तपासून पहाण्याची गरज असते.

एक म्हणजे, जी व्यक्ती आपल्या संपूर्ण आयुष्यात दुसऱ्यांना हसवते आणि त्याच्या मृत्यूनंतर सर्व समाज रडतो, अशा व्यक्तीस स्वर्ग प्राप्त झाला असे समजावे आणि जी व्यक्ती संपूर्ण आयुष्यात सर्व समाजाला रडवते आणि त्याच्या मृत्यूनंतर सर्व समाज हसतो त्यावेळी ती व्यक्ती नरकात गेली असे समजावे. दुसरे म्हणजे, माणूस मेल्यानंतर त्याच्या अंत्ययात्रेमध्ये सामील झालेला सर्व समाज धाय मोकलून रडतो त्यावेळी ती व्यक्ती स्वर्गात गेली असे समजावे आणि जर सर्व समाज त्यावेळी हसत असेल, मेला ते चांगले झाले असे म्हणत असतील, तर तो नरकात गेला असे समजावे.

मृत्यूनंतर एखादी व्यक्ती स्वर्गात गेली म्हटले की, त्याच्या आप्तमंडळीस आनंद होतो. कारण स्वर्गात सर्व देवदेवता असतात. त्या ठिकाणी सुख, शांती, आनंद, समाधान सर्व काही असते. असा आपला समज असतो. पण स्वर्गापेक्षा नरकच बरा असे वेदामध्ये सांगितले आहे. स्वर्गामध्ये ज्या देवदेवता आहेत त्यांच्या मते मृत्यूलोकात व स्वर्गलोकात आशा दोन्ही ठिकाणी केवळ दुःख आणि दुःखच भरलेले आहे. जे दुःख, वेदना, यातना मृत्यूलोकात आहेत त्या सर्व स्वर्गलोकातही आहेत. खरे आत्मिक समाधान स्वर्गातही नाही आणि नरकातही नाही. मृत्यूलोकात म्हणजे नरकात बाह्य आनंद नसतो पण त्याठिकाणी आंतरिक समाधान असते. पण स्वर्गलोकात बाह्यसमाधान असते पण आंतरिक समाधान नसते. उदा. द्यायचे झाले तर भिकारी आणि श्रीमंत माणसाचे देता येईल. भिकारी माणूस म्हणजे नरक होय. कारण त्याच्याकडे कोणत्याही सुखसोयी नसतात. आणि श्रीमंत माणूस म्हणजे स्वर्ग होय. कारण त्याच्याकडे सर्व

सुखसोयी असतात. पण भिकारी माणूस ज्याला आपण नरक समजतो त्याच्याकडे कसल्याही सुखसोयी नसल्या तरी मिळेल ते अन्न खाऊन जमीनीवर जिथे जागा मिळेल तेथे दगडाची ऊशी घेऊन पडल्या पडल्या शांत झोपतो. कारण त्याच्याकडे अंतरिक समाधान असते. तसेच स्वर्ग म्हणजे ज्याला आपण श्रीमंत माणूस समजतो त्याच्याकडे बाह्य आनंद असतो पण आंतरिक सुख नसते. जेवढी जास्त संपत्ती तेवढे दु:ख, चिंता जास्त असते. म्हणजेच ना गरीबीत सुख असते ना श्रीमंतीमध्ये. स्वर्गापेक्षा नरकच बरा असे देवदेवता का म्हणतात याचे विश्लेषणही वेदामध्ये पुढील प्रमाणे दिले आहे. मृत्यूलोकात माणसाला भगवतप्राप्ती करता येते. केलेल्या चुका सुधारण्याची संधी मिळत असते. दुसऱ्यांची सेवा करून आपल्या पदरी पुण्य जमा करता येते. तसे स्वर्गलोकात करता येत नाही. ज्यांनी खूप पुण्य जमा करून स्वर्गप्राप्ती केलेली असते ते सर्व पुण्य त्यांना स्वर्गलोकात खर्ची करावे लागते. कारण स्वर्गात फक्त आनंदच उपभोगता येतो. जमा असलेले पुण्य संपले की पून्हा मृत्यूलोकात यावे लागे. मृत्यूलोकात दुसऱ्यांची सेवा करून पुन्हा आपल्या नशिबी पुण्य जमा करावे लागते. पण ही संधी स्वर्गलोकात नसते. थोडक्यात काय तर, स्वर्ग आणि नरकातील व्यवहार हा बँकेतील खात्याप्रमाणे असतो. मृत्यूलोकात कष्ट करून, मेहनत करून बँकेतील खात्यात पैसा जमा करता येतो. गरज पडेल त्यावेळी खात्यामधून काढताही येतो. पण स्वर्गलोकात बँकेतील खात्यातून फक्त पैसे काढता येतात. त्यामध्ये जमा करता येत नाही. ज्यावेळी खात्यामधील सर्व रक्कम संपते त्यावेळी पुन्हा मृत्यूलोकात येऊन बँकेतील खात्यात पैसे जमा करता येतात. म्हणून, स्वर्गापेक्षा नरकच बरा अस वेद सांगतात.

मृत्यूलोक आणि स्वर्गलोक दोन्हीही मोह, माया, दु:ख, वेदना, ताण इ. नी भरलेली असतील तर खरे सुख म्हणजेच आत्मिक सुख कोठे आहे? असा प्रश्न आपल्या समोर पडतो. आत्मिक सुख हे स्वर्गात किंवा इतर कोठेही मिळत नसून ते परमेश्वराजवळच मिळते हे आपण विसरतो. आत्मिक सुख हवे असेल तर परमेश्वराची मनोभावे सेवा केली पाहिजे. मन आणि परमेश्वराचे नाते भक्कम केले पाहिजे. त्यावेळीच आत्मिक सुख मिळते. आपण काय करतो मंदिरात गेलो की, शांत रहातो, वाईट बोलत नाही, मोठ्याने बोलत नाही. देवाचे स्मरण करतो. कारण मंदिरात परमेश्वर असतो. असा आपला ठाम निश्चय झालेला असतो. पण तिथून बाहेर पडल्यानंतर या सर्वाचा आपणास विसर पडत जातो. आपल्या हातून अनेक वाईट घटना घडत असतात. एक अशाने आपणांस आत्मिक सुख मिळत नाही. परमेश्वर सर्वव्याप्त आहे, प्रत्येक कणाकणात त्याचा अंश आहे हे समजून आपण सर्व व्यवहार केले पाहिजेत. दुसऱ्यांच्या दुःखाने आपले डोळे पाणावले पाहिजेत. असेच व्यवहार परमेश्वर आपल्या खात्यात जमा करीत असतो. परमेश्वराची भक्ती मनापासून केली पाहिजे. मनापासून भक्ती करण्यासाठी मन स्वच्छ असावे लागते. माणसांच्या मनातील भाव / भावना यांची नोंद करण्याचे काम परमेश्वर करीत असतो. आपण दुसऱ्याबद्दल नुसता वाईट विचार केला तर त्याची नोंद परमेश्वर त्याच्या खात्यात करीत असतो मग तो विचार आमलात आणला नसला तरीही म्हणून आपल्या मनातील वाईट भावना प्रथम नष्ट करावी. त्याशिवाय आत्मिक सुख मिळत नाही.

आत्मिक सुख हे स्वर्गात मिळत नसून मृत्युलोकातच दुसऱ्यांची सेवा करून मिळवायचे असते हे लक्षात घ्यायला हवे.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३,
सुभाष रोड, कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे
भ्रमणध्वनी - ९९३०१४८४४६

●●●

प्रजनन म्हणजे नुसते जनन नसून प्रकर्षाने जनन होय.

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यामिक विभाग

❖ **सामुदायिक अथर्वशीर्ष पठण :**

'हिंदू जागृती मंडळ' सार्वजनिक गणेशोत्सव यांचे विद्यमाने ठाण्यातील शाळांमधून 'सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाचा' कार्यक्रम होतो. डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग, सकाळ सत्रातील विद्यार्थ्यांनी दि. ३ ऑक्टोबर या दिवशी अथर्वशीर्ष म्हणून या स्तुत्य उपक्रमामध्ये सहभाग घेतला. बुद्धिदात्या गणेशाचे स्तवन करून गणेशभक्तीचा आनंद घेतला.

❖ यावर्षी ठाण्यातील 'ठाणेवैभव' या दैनिकाने, पितांबरी उद्योगसमूहाच्या साहाय्याने एक अभिनव कल्पना राबवली, त्याला सर्वांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

ठाण्यातील २१ शाळांमधील, प्रत्येक शाळेतील २१ विद्यार्थी, दि. २१ सप्टेंबर या दिवशी शिवसमर्थ विद्या मंदिराच्या सभागृहात आमंत्रित केले, सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी गणरायासमोर सामुदायिक अथर्वशीर्ष पठण केले. ठाणे वैभवचे संपादक श्री. मिलींद बल्लाळ, पितांबरीचे श्री. परांजपे, आमदार श्री. संजय केळकर, स्थायी समितीचे सभापती श्री. मिलिंद पाटणकर आणि प्रमुख अतिथी ज्योतिर्भास्कर मा. जयंत साळगावकर यांची उपस्थिती होती.

सर्व सहभागी शाळांना गणरायाची प्रतिमा भेट म्हणून देण्यात आली. विद्यार्थ्यांना खाऊ वाटण्यात आला. पुढल्या पीढीला आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य सांगण्यासाठी केलेला हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय आहे.

❖ ब्राह्मण सेवा संघ, ठाणे शैक्षणिक विभागातर्फे दरवर्षी शिक्षक दिनाच्या निमित्ताने ठाण्यातील प्रत्येक शाळेतील एका शिक्षकाला 'आदर्श शिक्षक' पुरस्कार दिला जातो.

या वर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्कार ज्येष्ठ शिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांना मिळाला. प्रमाणपत्र आणि रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सर्वांतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

हा पुरस्कार सोहळा ब्राह्मण सेवा संघाच्या सभागृहात दि. १८ सप्टेंबर रोजी संपन्न झाला.

❖ दि. ३ ऑक्टोबर रोजी इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना पर्यावरणावरील माहितीपट दाखवण्यात आला. यात विद्यार्थ्यांना परिसंस्थेविषयी माहिती सांगण्यात आली. त्यातून पाण्याचे व जलचरांचे महत्त्व विद्यार्थ्यांना रंजक पद्धतीने सांगण्यात आले.

❖ ठाणे महानगरपालिकेतर्फे माजिवडा नाका येथे 'कलाभवन' उभारण्यात आले आहे. दि. २७ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर १० या कालावधीत तेथे 'मान्सून शो' आयोजित करण्यात आला होता. यात प्रसिद्ध चित्रकारांबरोबर हौशी चित्रकारांच्या चित्रांचाही समावेश होता. या प्रदर्शनाचा इ. ९ वीच्या विद्यार्थ्यांसह आपल्या कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांनी आस्वाद घेतला. या चित्रांतून चित्रांची मांडणी, रंगसंगती, पोतनिर्मिती इ. चे विद्यार्थ्यांनी निरीक्षण केल. त्यातून खूप काही मिळाल्याचे समाधान व्यक्त केले.

❖ लायनेस क्लब ऑफ उपवन, ठाणे आयोजित 'आदर्श शिक्षक पुरस्कार' सोहळ्यात शनिवार दि. २५ सप्टेंबर रोजी आपल्या शाळेतील सौ. साधना कारंडे-

जोशी यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. प्रमाणपत्र आणि चषक असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

तसेच ऑल राउंडर स्टुडंट म्हणून कु. ऋतुजा शिवाजी चंद्रराव इ. १० अ हिला गौरवण्यात आले.

दि. २६ सप्टे. रोजी सरस्वती स्कूल, ठाणे येथे लायन्स क्लब, ठाणे नॉर्थ आयोजित १० व्या आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत सहभागी झाल्याबद्दल कु. यश सारोळकर (१० अ) व कु. अक्षय पाटील (९ अ) यांना प्रशस्तिपत्रके प्राप्त झालीत.

सर्वांतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

❖ प्रतिवर्षाप्रमाणे विद्या प्रसारक मंडळ, ठाणे यांचेतर्फे जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा आयोजित केली होती. दि. २६ सप्टेंबर रोजी झालेल्या स्पर्धेत ठाण्यातील १४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये ओजस हळदणकर इ. ९ अ या विद्यार्थ्यास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

❖ दि. ६ व ७ ऑक्टोबर रोजी झालेल्या जिल्हा पातळीवरील खो-खो क्रीडा स्पर्धेत शाळेचे १४ वर्षाखालील व १७ वर्षाखालील मुलींचे संघ विजयी झाले. विजयी खेळाडूंचे अभिनंदन! तसेच त्यांना विभागीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा.

❖ दि. १२ व १३ ऑक्टोबर या दिवशी बदललेली मूल्यमापन पद्धती याबाबत सर्व शिक्षण मोहीमे अंतर्गत इ. ५ वी ते ८ वी च्या शिक्षकांसाठी चरई, ठाणे येथील क्र. २ या शाळेत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी शाळेतील इ. ५ वी ते ८ वी च्या शिकवणारे शिक्षक उपस्थित होते. या प्रशिक्षणात 'सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन' कसे करावे या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

❖ इ. १० ब मधील वैभव विश्वनाथन सकपाळ याची क्रिकेट या खेळासाठी मुंबई विभागातून निवड करण्यात आली. या संघासाठी ९०० मुलांपैकी फक्त १६ मुलांचीच निवड झाली. हरियाणा येथे हे सामने खेळण्यात आले. तेथे एकूण आठ राज्यांचे संघ आले होते. वैभव हा महाराष्ट्र राज्याकडून खेळला. त्याची 'उत्कृष्ट युवा खेळाडू' म्हणून निवड झाली.

❖ पर्यावरण दक्षता मंच व पी. ई. सोसायटी तर्फे दि. २ ऑक्टोबर रोजी पर्यावरण शाळा न्यू इंग्लिश स्कूल, नौपाडा, ठाणे (प.) येथे निसर्ग मेळा आयोजित केला होता. आपल्या शाळेतील इ. ७ वी क व इ. ७ वी ड मधील, विराज संजय रावण, संदीप आनंदा पाटील या विद्यार्थ्यांना प्रश्न मंजुषेमध्ये जिल्ह्यातून तिसरा क्रमांक मिळाला. त्यांचे हार्दिक अभिनंदन!

❖ दि. १८ ऑक्टो. रोजी शारदोत्सवानिमित्त रांगोळी स्पर्धा व मेहंदी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन उत्तम प्रतिसाद दिला.

❖ श्री समर्थ सेवक मंडळाची 'स्त्री कल्याण संघटना, ठाणे' यांचेतर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे आहे.

१) गट क्र. ७ इ. ९ वी, १० वी वैयक्तिक द्वितीय क्रमांक - अक्षय रावसो पाटील - ९ अ

२) गट क्र. ८ इ. ७ वी, ८वी - ढाल - प्रणिता हनुमंत काळभोर - ८ अ द्वितीय क्रमांक आणि वैयक्तिक पारितोषिक.

३) गट क्र. ९ इ. ९ वी , १० वी - ढाल - श्रीहरी पुरुषोत्तम मुळगुंद - ९ अ प्रथम क्रमांक आणि वैयक्तिक पारितोषिक

दुसऱ्यांना मोठेपणा द्यायला मन मोठे असावे लागते.

गट क्रमांक ९ साठीच्या ढाल स्पर्धेतील विजेती शाळा डॉ. बेडेकर विद्या मंदिर, ठाणे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन!

❖ १८ व्या राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेत शाळेतील इ. ६ वी तील विद्यार्थ्यांनी 'विविध जमिनींतील मातीची प्रतवारी तपासणे' हा प्रकल्प सादर केला. तालुका व जिल्हा पातळीवरून प्रकल्पाची विभागीय पातळीसाठी निवड झाली.

या प्रकल्पात ऋजुता काबाडी, ऐश्वर्या काटकर, संकेत दिवाण, सुशांत शिंदे, रोशनी दिघे हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

या प्रकल्पासाठी सौ. धोत्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

❖ १८ वी राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद - २०१० तर्फे होणाऱ्या बाल वैज्ञानिक प्रकल्पांतर्गत इ. ९ वी मधील विद्यार्थ्यांनी 'मातीतील जैविक व अजैविक घटकांचा संबंध अभ्यासणे' हा प्रकल्प सादर केला. त्याची प्रथम जिल्हा स्तरावर निवड झाली व नंतर पी.ई. हायस्कूल, ठाणे येथे जिल्हा स्तरावर प्रकल्प सादर केला. त्याची आता विभागीय स्तरासाठी निवड झाली आहे.

या प्रकल्पात खालील विद्यार्थी सहभागी होते. श्रीहरी मुळगंद, ऋषिकेश शिंदे, ओजस हळदणकर, तुषार सावंत, प्रणव नातू. विद्यार्थ्यांना श्री. शेलवले यांनी मार्गदर्शन केले.

❖ नेहरू सायन्स सेंटर, मुंबई आयोजित आंतरशालेय विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा मध्ये आपल्या शाळेतील इ. ९ वी च्या मुलांच्या गटाची उपांत्य फेरीसाठी निवड झाली आहे.

या गटात खालील विद्यार्थी सहभागी झाले होते. ऋषिकेश शिंदे, कुणाल क्षीरसागर, निखिल पाटील, चिन्मय दोडे. यांना श्री. शेलवलेसर व श्री. शिरापुरीसर यांनी मार्गदर्शन केले.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (माध्यमिक विभाग)

**क्रीडा :**

❖ इ. ६ वी तील विद्यार्थिनी वैष्णवी देसाई हिला आंतरशालेय जलतरण स्पर्धेत १०० मीटर Breast Stroke मध्ये सुवर्णपदक तर २०० मीटर Breast Stroke मध्ये रजतपदक मिळाले.

❖ आमच्या शाळेतील चौदा वर्षाखालील मुलींच्या बॅडमिंटन गटाने विभागीय स्तरावर रजतपदक मिळवले. नेहा दीक्षित, शलाका सहस्त्रबुद्धे, अनुज नरनावर आणि अदिती भावे ह्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

❖ वाशिंद येथे पार पडलेल्या 'Rink Skating' या खेळात इ. ७वी तील विद्यार्थिनी दिपा बौवा हिने विभागीय स्तरावरची पात्रता फेरी जिंकली.

❖ Directorate of Sports, Mumbai Division आयोजित विभागीय स्तरावरील टेबलटेनिस स्पर्धेत आमच्या शाळेतील मुलींना रजतपदक मिळाले. सहभागी विद्यार्थिनी - रिद्धी संख्ये, नेहा नवरे, राधिका राजवंशी, मैत्रेयी सत्रा आणि झिल बोरीचा.

❖ DSO, Thane आयोजित जिल्हास्तरीय आंतरशालेय टेबलटेनिस स्पर्धेत आमच्या शाळेतील १४ वर्षाखालील मुलांच्या आणि मुलींच्या गटाने रजतपदक मिळविले. सहभागी विद्यार्थी / विद्यार्थिनी - सिद्धेश पांडे, आशिश विचारे, श्रेयस पेंडसे, रिद्धी संख्ये, आभा मुतालिक, नेहा नवरे.

**श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा :**

गट २ रा – प्रथम क्रमांक – ओंकार गोखले

तृतीय क्रमांक – अक्षय चिद्रवार

**आदर्श शिक्षक आणि आदर्श विद्यार्थी पुरस्कार :**

❖ उपवन लायनेस क्लब तर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार सौ. अपर्णा भोळे यांना तर आदर्श विद्यार्थी पुरस्कार कु. अमित पाटणकर याला मिळाला.

❖ ब्राह्मण सेवा संघातर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार सौ. पूजा नाईक यांना मिळाला.

## तंत्रनिकेतन, ठाणे

**<u>वार्षिक अहवाल २००९ – २०१० :</u>**

**❖ उन्हाळी २००९ MSBTE च्या वार्षिक परीक्षेतील तंत्रनिकेतनमधील अव्वल क्रमांकाने यशस्वी झालेले विद्यार्थी :**

| नं. | कोर्स | नाव | गुण | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| १ | CH | वाघमारे अभिजित अरुण | १४२५ | १६०० | ८९.०६ |
| २ | CH | काळे सागर ज्ञानेश्वर | १३६२ | १६०० | ८५.१९ |
| १ | EPS | महाशब्दे गौरव श्रीनिवास | १३०१ | १५५० | ८३.९४ |
| २ | EPS | सिंग गिरीश भूपेंद्र | १२७८ | १५५० | ८२.४५ |
| १ | IE | मोहिते प्रवीण धनाजी | १४५७ | १६५० | ८८.३० |
| २ | IE | देशपांडे प्रत्युष सुहास | १४२७ | १६५० | ८६.४८ |
| १ | IS | सरपोतदार कार्तिक | १३३८ | १६०० | ८३.६३ |
| २ | IS | रानडे कौस्तुभ | १३११ | १६०० | ८१.९४ |
| १ | IF | मुळये चिन्मयी नितिन | १३२३ | १५०० | ८८.२ |
| २ | IF | अबनवे महेश अशोक | १२९४ | १५०० | ८६.२७ |
| १ | CO | गुप्ता आशिष चमन | १३२२ | १४५० | ९१.१७ |
| २ | CO | राक्से रमेश मोहन | १३१९ | १४५० | ९०.९७ |
| १ | MU | खोत सुजाता विलास | १४७० | १७०० | ८६.४७ |
| २ | MU | साखरदांडे जयंत दिलीप | १४४३ | १७०० | ८४.८८ |

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या केमिकल इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीत मास्टर वाघमारे अभिजित अरुण ह्या विद्यार्थ्याचा दुसरा क्रमांक होता.

**उन्हाळी २००९ च्या निकालाचे विश्लेषण :**

| वर्षे | प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|---|
| परिक्षेला बसलेले विद्यार्थी | ३४८ | ३५९ | ३०६ |
| विशेष गुणवत्ता | ३० | ६७ | १४५ |
| प्रथम श्रेणी | १३९ | १५३ | १४३ |
| द्वितीय श्रेणी | १७ | ३१ | ३ |
| तृतीय श्रेणी | – | – | – |
| Id FLy | - | - | १० |
| ATKT | ११८ | ४७ | - |
| टक्केवारी | ८७ | ८३ | ९८ |

**❖ उन्हाळी २०१० MSBTE च्या वार्षिक परीक्षेतील तंत्रनिकेतनमधील अव्वल क्रमांकाने यशस्वी झालेली विद्यार्थी :**

| नं. | कोर्स | नाव | गुण | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| १ | CH | साळवी हर्षदा अविनाश | १२८६ | १६०० | ८०.३७ |
| २ | CH | सतारकर अक्षर मन्सूर | १२१३ | १६०० | ७५.८१ |
| १ | EPS | इडुधन रोझमी जॉर्ज | १३४२ | १५५० | ८६.५८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | EPS | मदन गौरी राजेंद्र | १३३५ | १५५० | ८६.१३ |
| १ | IE | प्रभू अक्षता नरसिन्ह | १४७३ | १६५० | ८९.१३ |
| २ | IE | डोबळे ऋषम सुधीर | १४४२ | १६५० | ८९.१३ |
| १ | IS | नारगीलकर योगेश राजेंद्र | १३६५ | १६०० | ८५.३१ |
| २ | IS | कुलकर्णी राहुल राजन | १३२८ | १६०० | ८३.०० |
| १ | IF | अग्रेसर स्नेहल नितिन | १३६५ | १५०० | ९१.०० |
| २ | IF | सराफ अनिश अमरनाथ | १३२१ | १५०० | ८८.०७ |
| १ | CO | पांडे सोनाक्षी | १३१४ | १४५० | ९०.६२ |
| २ | CO | पंड्या श्रीकांत दुर्योधन | १२८९ | १४५० | ८८.८९ |
| १ | MU | परब सानिका मंगेश | १४६४ | १७०० | ८६.११ |
| २ | MU | डुंबरे पूनम नारायण | १४४३ | १७०० | ८४.८८ |

**उन्हाळी २०१० च्या निकालाचे विश्लेषण :**

| वर्षे | प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|---|
| परिक्षेला बसलेले विद्यार्थी | ३४८ | ३४६ | ३७३ |
| विशेष गुणवत्ता | २४ | ७० | १८१ |
| प्रथम श्रेणी | ११४ | १४७ | १५० |
| द्वितीय श्रेणी | ११६ | ९१ | ०३ |
| तृतीय श्रेणी | ०६ | – | – |
| WFLy | - | - | २० |
| ATKT | ३७ | ०७ | - |
| टक्केवारी | ८५ | ९१ | ९५ |

❖ **२००९ – २०१० या शैक्षणिक वर्षापासून तंत्रनिकेतनला दोन पदविका अभ्यासक्रमांस परवानगी मिळाली. ते दोन पदविका अभ्यासक्रम खालील प्रमाणे :**

१) Advanced Diploma Programmes in Energy Management and Audit (ER)

2) Embedded Systems (ES)

❖ नवीन आणि अपारंपरिक ऊर्जा विभागाच्या सहकार्याने महत्त्वकांक्षी ऊर्जा पार्क योजना तंत्रनिकेतनच्या विद्युत अभियांत्रिकी विभागातर्फे राबविली जात आहे. अशा या महत्त्वकांक्षी ऊर्जा पार्क योजनेचे उद्‌घाटन वि. प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे हस्ते दि. १२ सप्टेंबर २००९ रोजी करण्यात आले. अशा प्रकारच्या एकमेव योजनेमुळे समाजामध्ये अपारंपरिक ऊर्जेविषयी जाणीव निर्माण होऊन विद्यार्थ्यांसाठी नवीन-नवीन प्रकल्प निर्माण करण्यास मदत होत आहे.

❖ विद्या प्रसारक मंडळाच्या व्यवस्थापनाने डॉ. डी. डी. काळे (माजी नामवंत प्राध्यापक UICT, मुंबई) यांची तंत्रनिकेतनाच्या गर्व्हर्निंग बॉडीमध्ये शिक्षणतज्ज्ञ सभासद म्हणून नेमणूक केली.

❖ १५ सप्टेंबर हा अभियांत्रिकी दिन म्हणून ISTE Student Chapter तर्फे आयोजित करण्यात आला होता. श्री. एम. पी. कुलकर्णी (चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक, आशिदा इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि.) यांना प्रमुख व्याख्याते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. सन्मानीय पाहुणे म्हणून श्री. अश्विन राजपुरोहित (व्यवस्थापकीय संचालक, CPEL प्रा. लि.) हजर होते. आशिदा इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि. ने ५०,०००/- रुपये शिष्यवृत्तीस गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी देण्याची घोषणा केली. शिवाय केमिकल प्रोसेस इंजिनिअर्स लि. मुंबई तर्फे रुपये २०,०००/- शिष्यवृत्ती देण्याची घोषणा केली. त्याचदिवशी प्रथम द्वितीय आणि तृतीय वर्षातील अव्वल गुणांनी यश

संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

❖ आठवी राष्ट्रीय एक दिवसीय परिषद १९ सप्टेंबर २००९ रोजी 'Advancements in Medical Instrumentation' या विषयावर भरविण्यात आली होती. परिषदेचे प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. नागराज हुईलगोल, (Chief Radiation Oncologist Dept. of Radiation Oncologist Dr. Balabhai Nanavati Hospital, Mumbai) व प्रमुख वक्ते म्हणून डॉ. दीपक पाटकर (इनचार्ज MRI आणि CT Scan विभाग डॉ. बालाभाई नानावटी हॉस्पिटल, मुंबई ) हे उपस्थित हे. श्री. व्ही. एम. जोशी (Head, Ultrasonic Instrumentation Section, BARC, Mumbai) यांनी पुढील सत्राचे प्रमुख म्हणून काम पाहिले. पहिल्या सत्रात पाच वक्ते होते. ते खालील प्रमाणे -

- डॉ. वेंकटेश रंगराजन, प्रोफेसर न्यूक्लिअर मोडिसीन बायो इमेंजिंग युनिट, टाटा मेमोरिअल सेंटरल, मुंबई.
- डॉ. एन. के. राणा, इन्स्टुमेंटेशन विभाग प्रमुख राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी, मुंबई.
- श्री. पी. आर. तेंडुलकर, क्लिनिकल ॲप्लीकेशन स्पेशॅलिस्ट, फिलिप्स वेल्थकेअर.
- डॉ. एन. शिवप्रसाद, सिनिअर मॅनेजर, BRIT, ॲटोमॅटिक एनर्जी विभाग.
- डॉ. अभिजित पवार MD रोडिऑलाजी, डायरेक्टर न्युक्लिअस डायगॉस्टिक सेंटर, पुणे आणि प्रोफेसर काशीबाई नवले मेडिकल कॉलेज, पुणे.

परिषदेच्या अखेरच्या सत्राचे काम श्री. प्रमोद शानबाग (इनचार्ज IT विभाग. सेन्ट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई.) यांनी पाहिले होते. परिषदेला २०० प्रतिनिधी हजर होते.

❖ ९वी एक दिवसीय राष्ट्रीय परिषद "Industrial Safety Practices for Peace, Productivity and Profit" या विषयावर शनिवार दि. १० ऑक्टोबर २००९ रोजी पार पडली. सुरुवातीला परिषदेला आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे औपचारिक स्वागत प्रोफेसर व्ही. एस्. भाकरे (co-convener of conference) यांनी केले. प्रमुख पाहुणे डॉ. अविनाश पाटकर (इनचार्ज MRI आणि CT Scan विभाग डॉ. बालाभाई नानावटी हॉस्पिटल, मुंबई ) त्यांनी 'Safety practices in High Power Trans-Mission' यांनी 'Safety Practices in Manufacturing, Application and Distribution of Agro Chemicals' संबधीची माहिती दिली. श्री. एस.व्ही. करंदीकर (सदस्य, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे) यांनी सामाजिक जबाबदारीची भूमिका विद्या प्रसारक मंडळ अशा महत्त्वपूर्ण राष्ट्रीय परिषदा आयोजनला महत्व देवून पार पाडत असल्याचे सांगितले.

परिषदेत खालील तज्ज्ञ मंडळीनी शोधनिबंध सादर केले.

| **निबंध सादरकर्ते** | **विषय** |
|---|---|
| १) आदर्शकुमार सेहगल, व्ही. प्रेसिडेण्ट HR आणि ॲडमिनिस्ट्रेशन | Safety Practices in Infractructure |
| २) श्री. मनीष गाला, संचालक सिग्मा असोसिएट्स प्रा. लि. | Safety in use of Pressure Vessels |
| ३) श्री. निलेश गोरे डेप्युटी मॅनेजर, सेफ्टी स्पेशॅलिटी म्वॉलिक्युलस लि. | Safety Practices in Offshaer drilling operations |

श्री. पी. एन. जुमले, डायरेक्टर बोर्ड ऑफ ॲप्रन्टीसशीप ट्रेनिंग (वेस्टर्न रिजन) मुंबई यांनी BOAT तर्फे अभियांत्रिकी पदवी व पदविका यांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करीत असल्याचे सांगितले

दुसऱ्या सत्राचे प्रमुख म्हणून श्री. प्रशांत कोकिल (मॅनेजर, CHE टाटा पॉवर कंपनी लि.) व डॉ. डी. डी. काळे (UCIT, मुंबई) यांनी काम पाहिले. '' प्लास्टिक निर्मितीमध्ये सुरक्षितता'' या विषयी डॉ. डी. डी. काळे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. श्री. श्रीकांत भणगावकर (मॅनेजर, ट्रान्सामिशन लाईन्स टाटा पॉवर कंपनी) यांनी "Transmission Line Safety" या विषयीचे विचार मांडले. "Lock Tag and (LTT)" संबधी निबंध सादर केला. श्री. डी.बी. कांबळे (प्रमुख प्रोसेस मॅनेजर, BPCL) यांनी "Safety in Petroleum Refinery" या विषयी माहिती दिली.

परिषदेला २५० प्रतिनिधी हजर होते. संस्थेला इंडस्ट्री, प्रायोजक आणि नोंदणीद्वारे रुपये ४.५ लाख प्राप्त झाले.

❖ बोर्ड ऑफ ॲप्रेंन्टिशिप ट्रेनिंग (वेस्टर्न रिजन) मुंबई यांनी शेअर भागधारकांची सभा दि. २६ नोव्हेंबर २००९ रोजी आयोजित केली होती. तंत्रनिकेतनाच्या पुढाकाराने ही सभा पाणिनी सभागृह येथे पार पडली. औद्योगिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील ७० मान्यवर हजर होते. त्यांनी कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवीधारकांकरिता ॲप्रेंटिशिप ट्रेनिंग विषयीचा दृष्टिकोन विषद केला.

❖ गुरुवार दि. २७ नोंव्हेंबर २००९ रोजी तंत्रनिकेतनाच्या नूतनीकृत आणि सोयी-सुविधांनी युक्त अशा मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे उद्घाटन डॉ. विजय बेडेकर (कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे) यांचे शुभहस्ते करण्यात आले.

❖ शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर २००९ रोजी पुढील शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ च्या मान्यतेसाठी 'मॅडेटरी डिसक्लोजर्स ॲण्ड कंपायलन्स रिपोर्ट' डायरेक्टर ऑफ टेक्नीकल एज्युकेशन रिजनल ऑफिस मुंबई येथे सादर केला. राज्य पातळीवरील तज्ज्ञ समितीने संस्थेच्या तपासणीकरिता दि. ०८ डिसेंबर २००९ रोजी भेट दिली. १९ जून २०१० रोजी All India Council for Technical Education (AICTE) कडून वर्ष २०१० ते २०१३ पर्यंत मान्यता वाढवली.

❖ जानेवारी २०१० च्या शेवटच्या आठवड्यात विभागानुसार माजी विद्यार्थ्यांची सभा आयोजित करण्यात आली होती. सभा बोलविण्यामागचा उद्देश असा होता की तंत्रनिकेतनच्या कार्यामध्ये त्यांचा सहभाग असावा. गेस्ट लेक्चरर्स, ज्युनिअर्ससाठी प्लेसमेन्ट व व्होकेशन ट्रेनिंग इत्यादीसाठी त्यांचा सहभाग व सहकार्य लाभत असते.

❖ तंत्रनिकेताकरिता राष्ट्रीय पारितोषिके

३९ वी ISTE National Annual Convention शुक्रवार दि. १८ डिसेंबर २००८ National Institute of Technology रोजी सुरतकल, कर्नाटक येथे भरली होती. त्याप्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन,ठाणे या संस्थेस खालील पारितोषिके देण्यात आली.

अ) ISTE Narsee Monjee Award for Polytechnics in Maharastra state for best overall Performance for the year 2009.

ब) ISTE Best Chapter Award Maharastra and Gao 2009.

❖ हिवाळी परीक्षा संपली आणि सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा २८ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०१० दरम्यान पार पडल्या. विद्यार्थ्यांमधील कला गुणांना वाव मिळावा ह्या उद्देशाने त्यांना एक छोटेसे व्यासपीठ निर्माण केले जाते.

❖ 'मोफत डोळे तपासणी शिबीर' दि. २९ डिसेंबर रोजी सर्व विद्यार्थी व स्टाफकरिता १०.०० ते ५.०० या वेळेत आयोजित करण्यात आले होते. डॉ. उदय गाडगीळ, नेत्रतज्ज्ञ, ठाणे यांनी length on Lasik Procedure, चष्म्यावर अवलंबून न राहणे शिवाय Contact lanes, इत्यादीविषयी माहिती उपस्थितांना करून दिली. जवळ-जवळ शंभर विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी डोळे तपासून घेतले.

❖ "Plasma Pheresis" या विषयावर दि. २० फेब्रुवारी २०१० रोजी ISTE Student Chapter द्वारे डॉ. कल्पना बेलसकर (रिलायन्स, लाईफ सायन्स विभाग) यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

दि. ५ आणि ६ मार्च २०१० रोजी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने 'Workshop on Implementation of C to E Scheme' आयोजित केली होती. ही कार्यशाळा विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे येथे घेण्यात आली होती.

सन २००९-२०१० या वर्षात तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांत भाग घेऊन पारितोषिके प्राप्त केली आहेत. ते विद्यार्थी खालीलप्रमाणे.

अ) "Green Building", 'A Path towards zero Building' या विषयीचा 'प्रकल्प' इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिमच्या तृतीय वर्षातील विद्यार्थी श्री. गौरव महाशब्दे श्री. सिद्धेश तारे, श्री. अनिरुद्ध पाटील व श्री. तेजस मालवणकर यांनी बनविला होता. ह्या प्रकल्पाला 'Special appreciation prize in the Tata power' हे पारितोषिक प्राप्त झाले. प्रकल्पाच्या मार्गदर्शक म्हणून प्रा. सौ. एन. व्ही. वडेर (एनर्जी मॅनेजर) होत्या.

ब) तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल पावर सिस्टिम मधील विद्यार्थी कु. सुरभी शहा आणि श्री. प्रणय सोनाग्रे यांनी औरंगाबाद येथील शासकीय तंत्रनिकेतनाद्वारे आयोजित 'e-tycoon' 10 या स्पर्धेत क्रमांक दोनचे पारितोषिक प्राप्त केले. ही स्पर्धा औरंगाबाद येथे दि. २३ फेब्रुवारी २०१० रोजी झाली व विषय होता ''ऊर्जा व्यवस्थापन'.

क) 'अपारंपरिक ऊर्जा साधने' या विषयावर इंटर कॉले - जिएट निबंध स्पर्धा शिवाजीराव एस. जोंधळे, तंत्रनिकेतन, अंबरनाथ येथे आयोजित करण्यात आली होती. तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टमचे विद्यार्थी कु. रसिका कुलकर्णी, कु. हर्षदा गायकवाड आणि श्री. योगेश कुंभार व श्री. गणेश पिंगळे ह्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यांना अनुक्रमे प्रथम व दुसऱ्या क्रमांकाची पारिताषिके प्राप्त झाली.

ड) दि. २८ जानेवारी २०१० रोजी "Digital Signal Processing" विषयी L & T Institute of Technology. पवई मुंबई येथील स्पर्धेत तृतीय वर्षे इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्सचे विद्यार्थी श्री. ऋषभ डोंबळे आणि श्री. श्रीरंग नांदेडकर यांनी पहिल्या क्रमांकाचे (INTERAGATE) बक्षिस जिंकले.

इ) श्रीराम तंत्रनिकेतन, ऐरोली नवी मुंबई येथे ऊर्जा व्यवस्थापन विषयावर दि. २ फेब्रवारी २०१० रोजी घेण्यात Power Presentation स्पर्धेत प्रथम वर्षात शिकत असलेल्या कु. सुरभी चौधरी या विद्यार्थिनीने उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले.

फ) 'Vain Security System' या विषयावर निबंध सादरीकरण स्पर्धेत तृतीय वर्षे इन्स्ट्रुमेंटेशन मधील विद्यार्थी श्री. सुरज सूर्यवंशीने तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

य) पद्मभूषण वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी येथे आयोजित करण्यात आलेल्या "Technical Quiz" स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस इन्स्ट्रुमेंटेशन

विभागातील विद्यार्थी श्री. ऋग्वेद गोडबोल व श्री. राहुल कुलकर्णी यांनी मिळविले.

र) दि. ५ फेब्रुवारी २०१० रोजी श्रीराम तंत्रनिकेतन, एरोली आयोजित 'टेक्नीकल क्रॉसवर्ड स्पर्धेत श्री. निशांत व्ही. आर्यमाने आणि श्री. अवधूत जे. तावडे यांनी ३ ऱ्या व ४ थ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

ल) L & T Institutte of Technology आयोजित 'Digital Signal Processing'. MP-Pro Ex-2010, Image Processing विषयीच्या राज्य पातळीवरील स्पर्धेत श्री. श्रीरंग नांदेडकर, श्री. ऋषभ डोंबळे, आणि कु. अक्षता प्रभू या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकविले होते.

व) २४ डिसेंबर ते ७ जानेवारी २०१० दरम्यान कारवार कर्नाटक येथे Ocean to SKY trek मध्ये ४ NCC विद्यार्थी सहभागी झाले होते.

'Broader perspectives of Language, Thinking and Technology' या विषयावर शनिवार दि. ३ जुलै २०१० रोजी १० व्या एकादिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेचे उद्घाटक डॉ. एम. ससीकुमार (संचालक, संशोधन आणि विकास कार्पोरेट C-DAC मुंबई) होते. आपल्या प्रमुख भाषणात त्यांनी विविध प्रकारच्या भाषा, प्रादेशिक बोलीभाषा आणि भाषेवर प्रभुत्व येण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाची भूमिका इत्यादी बाबतीत आपले विचार प्रकट केले. परिषदेचे प्रमुख वक्ते म्हणून डॉ. सुसिलकुमार कोप्यारपू होते. त्यांनी 'Natural language usable user Interface' सबंधीचे विचार प्रकट केले. पहिल्या सत्राचे काम श्री. विपुल कुकरेजा (डायरेक्टर आणि CEO, M2S consulting Pvt. Ltd.,) आणि प्रा. सौ. उषा राघवन यांनी पाहिले. पहिल्या सभेत नऊ निबंध सादर करण्यात आले होते.

निबंध सादरकर्ते खालील प्रमाणे होते.

१) श्री. विपुल कुकरेजा, डायरेक्टर आणि CEO M2S consulting Pvt. Ltd.,

२) श्री. रंगानाथ अयंगार, डायरेक्टर आणि मॅनेजिंग पार्टनर स्ट्रेटेजिक इनव्हेंशन्स इंडिया प्रा.लि.

३) सौ. अर्चना राणे, शर्मा एज्युकेशनल टेक्नालॉजी युनिट, C-DAC मुंबई

४) श्रीमती लिना हुन्नरगीकर, IIT मुंबई

५) प्रोफेसर व्ही. एस. भाकरे, सन्मानीय प्रोफेसर इंडस्ट्री इंटरॅक्शन, विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे.

६) मिस. अपर्णा मुखर्जी C-DAC मुंबई

७) श्री. भाऊसाहेब बिरादर, IIT मुंबई

८) डॉ. माधुरी पेजावर प्राचार्या, रीडर, विभाग प्रमुख प्राणिशास्त्र विभाग बी. एन. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स, ठाणे.

९) श्री. प्रकाश पिंगळे, श्री. सर्वेश निकुंभ - C-DAC, मुंबई

१०) श्री. बिरचंद्र सिंग C-DAC मुंबई

परिषदेच्या दुसऱ्या सत्राचे काम डॉ. दिनेश कुमार आणि प्रा.सौ. व्ही. ए. जोशी यांनी पाहिले.

दुसऱ्या सत्रातील निबंध सादरकर्ते खालीलप्रमाणे होते.

१) प्रा. निता चक्रवर्ती इंग्रजी विभाग प्रमुख आर. जे. कॉलेज मुंबई

२) डॉ. माधुरी पेजावर प्राचार्या, रीडर, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख वि.प्र. मंडळाचे बी. एन. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स, ठाणे

३) सौ. के. एस. आगाशे

४) डॉ. उल्का नातू Gynecologist

५) सौ. सुचेता रॉय चौधरी SIES कॉलेज ऑफ आर्टस सायन्स आणि कॉमर्स मुंबई

६) मिस. अश्विनी ए. जोशी लेक्चरर माहिती तंत्रज्ञान विभाग, मनोहर फाळके पॉलिटेक्नीक सायन्स, मुंबई

परिषदेच्या दुसऱ्या सत्राच्या शेवटी संघटन सचिव सौ. जी. एस. इंगवले यांनी मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानले. सदर परिषदेला १५० प्रतिनिधी उपस्थित होते. संस्थेला प्रायोजकाकडून आणि नोंदणीद्वारे १ लाख सतरा हजार रूपये प्राप्त झाले.

**भविष्यकालीन योजना**

१) २० ऑगस्ट २०१० रोजी ''राजीव गांधी अक्षय ऊर्जा'' दिनाचे आयोजन

२) "Technology - a strategy for safety in IMF rastructure" विषयावर शनिवार दि. २३ ऑक्टोबर २०१० रोजी ११ व्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

३) "Future Power Systems for Green and Clean words" या विषयावर एक दिवसीय १२ व्या राष्ट्रीय परिषदेचे दि. २० ऑगस्ट २०११ रोजी आयोजन.

– प्राचार्य दि.कृ. नायक
विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे
(मराठी अनुवाद – श्री. चंद्रकांत शिंगाडे)

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनात ''अभियांत्रिकी दिनाचे'' आयोजन

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे येथे १५ सप्टेंबर हा दिवस अभियांत्रिकी दिन म्हणून साजरा करण्यात आला. विश्वेश्वरैया यांच्या जन्म दिनानिमित्त हा दिवस भारतात दरवर्षी साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून तंत्रनिकेतनात १५ सप्टेंबर २०१० रोजी ४.०० वाजता हा दिवस साजरा करण्यात आला. श्री. सुयश कुलकर्णी आणि श्री. एस. डी. नाईक हे (संचालक आशिदा इलेक्ट्रानिक्स) प्रमुख अतिथी म्हणून हजर होते, प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व ओळख कु. ऋचा कोल्हाले यांनी उपस्थितांना करून दिली. प्राचार्य दि. कृ. नायक यांनी अभियांत्रिकी दिनाचे महत्त्व विशद केले. त्यानंतर प्रा. व्ही. एस. भाकरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सदर दिनाचे निमित्त आशिदा इलेक्ट्रानिक्स तर्फे पाच गुणवंत आणि गरजू विद्यार्थांना शिष्यवृत्ती देण्यात आल्या.

**शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी खालीलप्रमाणे :-**

१) प्रवीण भैरु नवले (TYMU)

२) संजय गुप्ता (TYCO)

३) अजित तानाजी आग्रे (SYEP)

४) स्नेहा धनंजय रेपाळे (SYMU)

५) अजय यशवंत सुरेकर (SYIF)

शिवाय संस्थेत २० वर्षे कालावधी पूर्ण करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार स्मृतिचिन्ह देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

**सत्कारमूर्ती शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी खालील प्रमाणे :-**

१) सौ. के. एस. आगाशे (IE DEPT.)

२) सौ. व्ही. ए. जोशी (IS DEPT.)

३) श्री. टी. व्ही. मोहिते पाटिल (MU DEPT.)

४) सौ. एस. के शुक्ला (CO DEPT.)

५) श्री. व्ही ए. वालावलकर (CHEMISTRY)

६) सौ. बी. ए. जोशी (LIBRARY)

७) श्री. एस. जी. शेलार (CH DEPT.)

८) श्री. एस. एस. साटले (OFFICE)

९) श्री. डब्लू. के. विचारे (IS DEPT.)

१०) श्री. आर. डी. पाटील (CO DEPT.)

११) श्री. राजबीर धिंगान

ज्ञानदानाच्या कार्यात आपल्या विषयात १००% निकाल लावणाऱ्या शिक्षकांचा सत्कार या प्रसंगी प्रमुख मान्यवरीच्या हस्ते करण्यात आला.

**सत्कारमूर्ती शिक्षक खालीलप्रमाणे :-**

१) श्री. एस.एस. मुजुमदार (CH DEPT.)

२) सौ. के. एस. आगाशे (IC DEPT.)

३) सौ. व्ही. ए. जोशी (IS DEPT.)

४) सौ. उषा राघवन (IF DEPT.)

५) सौ. एस. एस. कुलकर्णी (EPS DEPT.)

६) सौ. ॲनिस ॲलिस (EPS DEPT.)

७) सौ. आर. यु. पाटील (EPS DEPT.)

८) सौ. ए. एस. दिवाकर (IF DEPT.)

९) सौ. एस. एस. जपे (CH DEPT.)

१०) सौ. एस. डी खंडागळे (IS DEPT.)

११) सौ. एस. एम. लगुडुवा (IE DEPT.)

१२) सौ. आर. जी. तेंडुलकर (IF DEPT.)

१३) कु. रुचा कोल्हाले (IS DEPT.)

१४) कु. दिप्ती मेस्त्री (IS DEPT.)

१५) सौ. व्ही. वाय. सोनावणे (IF DEPT.)

१६) सौ. शितल म्हात्रे (MU DEPT.)

१७) सौ. अर्चना मोहिते (MU DEPT.)

१८) सौ. मुग्धा राणे (IE DEPT.)

१९) सौ. समृद्धी पिटकर (IE DEPT.)

२०) सौ. स्वाती जोशी (IF DEPT.)

कार्यक्रमाची सांगता प्रा. व्ही. ए. वालावलकर सरांच्या आभारप्रदर्शनाने झाली.

## विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनमधील डॉ. सौ. आर. के. जांबोटकर सेवानिवृत्त



विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनामध्ये दि. १२.०७.१९८६ पासून कार्यरत असलेल्या डॉ. सौ. आर. के. जांबोटकर ह्या आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. ३० सप्टेंबर २०१० रोजी सेवानिवृत्त झाल्या.

अत्यंत मन मिळाऊ कर्तव्यात थोडीही कसूर न ठेवणाऱ्या आणि विद्यार्थीप्रिय म्हणून त्यांची ख्याती होती. परीक्षा विभागाची जबाबदारी त्यांनी अत्यंत चोखपणे सांभाळली होती. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांचे हस्ते स्मृतिचिन्ह व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

त्यांचे पुढील आयुष्य आरोग्यसंपन्न समृद्धीचे जावो ही सर्वांतर्फे त्यांना हार्दिक शुभेच्छा!

वृत्तसंकलन
श्री. चंद्रकांत शिगाडे
वि. प्र. मं. चे तंत्रनिकेतन, ठाणे

मुलपृष्ठ २ वरून – संपादकीय – **संस्कृतचे ऋण**

करताना संकोचल्यासारखे वाटते. संस्कृत भाषा आणि देवनागरी लिपी ही साहित्य निर्मितीच्या क्षमतेपेक्षा त्यातील निर्मितीतील विज्ञान समजावून सांगितल्यामुळे व्यक्तीच्या सृजनशीलतेत व कल्पकतेमध्ये जी भर पडते, ती अतिशय महत्त्वाची आहे. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे मेंडेलिव याची आवर्त सारणी (पिरीऑडिक टेबल). या सारणीत त्यांनी एकम, द्वि, त्रि असे संस्कृत शब्द वापरले आहेत. अर्थातच कुणाही रसायनशास्त्रज्ञाला वा भारतीयाला त्याने हे का केले हा प्रश्न कधी पडला नाही; परंतु हे कोडे कार्पिन्स्की या एका अमेरिकन अभ्यासकाने सोडवले व आवर्त सारणीची रचना करताना मेंडेलीवला पाणिनीच्या शिवसूत्रातील अर्थ गर्भित होता व त्यात असणाऱ्या द्विस्तरीय रचनेचा त्याच्यावर प्रभाव होता हे दाखवून दिले. मेंडेलिव हा कोणी संस्कृत तज्ज्ञ नव्हता. बोथलिंग याने १८५० ते ७० च्या दरम्यान पहिला संस्कृत जर्मन शब्दकोश रशियातील पीटस्बर्ग येथे प्रकाशित केला. त्याने पाणिनीय व्याकरणाचे भाषांतर अभ्यासकांपर्यंत नेले. सेंट पीटस्बर्ग येथे त्याच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनास बोथलिंग यांनी मेंडेलिव यांना पाचारण केले होते आणि तेथेच मेंडेलिव यांना पाणिनीच्या रचनेची प्रथम ओळख झाली.

प्रश्न सृजनशीलता आणि कल्पकतेचा आहे. संस्कृत ही कुठल्या देशाची वा समाजाची भाषा आहे हे मेंडोलिव यांना ज्ञान होते. पण त्यांच्यावर द्वेष वा मत्सराचे संस्कार करणारी मंडळी त्यावेळी तेथे नव्हती. संस्कृत भाषा आणि हवे तर ती भाषा जाणणाऱ्या समाजाचा मत्सर अवश्य करा. पण त्याच्या निर्मितीमागील विज्ञान नाकाराल तर मात्र सृजनशील प्रक्रियेपासून वंचित व्हाल!

•••

## वस्तुसंग्रहालयांतील वस्तूंचे जतन

वस्तुसंग्रहालयांच्या दालनांमध्ये असणाऱ्या सापेक्ष आर्द्रतेचा व वातावरणातील बदलांचा अभ्यास ही स्वतंत्र ज्ञान शाखा आहे. या संदर्भातील प्रमाणाकांवर विचार करणारा एक परिसंवाद लंडनच्या मिलवाड्भी मध्ये काही महिन्यांपूर्वी झाला. प्रमाणकांमध्ये असा बदल करणे व त्यांत अधिक संक्शोधन करणे शक्य आहे असे तेथील सहभागी तज्ज्ञांना जाणवले.

इंडियानापोलिसचे संचालक मॅक्सवेल अँडरसन यांनी या वातावरणीय नियंत्रण प्रमाणकांमधे अधिक परिवर्तनीय बदल करण्यासंबंधीचे विचार 'आर्टन्यूजपेपरच्या एप्रिलच्या अंकात मांडले होते. त्या संदर्भात आंतरराष्ट्रीय संवर्धन संस्था (International Institute for Conservation ITC) व अमेरिकेतीलसंवर्धन संस्था (American Conservation Institute - AIC) यांनी परिसंवाद आयोजित केला. अॅडरसन यांनी '१००हून अधिक अभ्यासकांपैकी कोणीही गटाच्या (पॅनल) निष्कर्षाला आव्हान दिले नाही' असे सांगितले. हा निष्कर्ष होता 'आपल्या संग्रहातील वस्तू अत्यंत विविध मर्यादांत सापेक्ष आर्द्रतेचा तग धरू टाकतात.'

आयआयटीचे अध्यक्ष लॉस एंजिलीसच्या 'जे पॉल गेटी म्युझियामधे' वरिष्ठ संवर्धन यांनी परिसंवादाला समारोप केला. हा व्यवसाय वातावरणीय प्रमाणकांमधील सूक्ष्म भेदांकडे वाटचाल करत असल्याचे मत त्यांनी नोंदवले. याचा अर्थ वारावरणीय परिस्थितीच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात बदल होत असल्याने व वस्तुसंग्रहालयातील वस्तूंमधील संकुलता वाढत असल्याने संशोधनाच्या गरजा वाढत आहेत.

संदर्भ : The Arts News Paper No. 214 जून २०१०

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❉ संपर्क ❉

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे–४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.